# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| संपादक | : | डॉ. विजय वा. बेडेकर |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | २००४ |
| वर्ष | : | पाचवे |
| अंक | : | ६ |
| पृष्ठे | : | ४० पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या "ग्रंथालय" प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**

**गणपत्रिका क्रमांक : ८१**

MAHMARI 19358/13/1/2000-TC

विद्या प्रसारक मंडळ
ठाणे

# व्ही. पी. एम्. दिशा

वर्ष पाचवे / अंक ६ / मे २००५

## ॥ भावपूर्ण श्रद्धांजली ॥



विद्याप्रसारक मंडळाचे अध्यक्ष

**डॉ. वा. ना. बेडेकर**

जन्म : दि. २०/२/१९१७ • मृत्यू : दि. १४/४/२००४

व्ही. पी. एम्.

# दिशा

वर्ष पाचवे / अंक ६ / मे २००४

संपादक
डॉ. विजय वेडेकर

कार्यकारी संपादक
प्रा. मोहन पाठक

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष ८ वे / अंक ११वा)

कार्यालय
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. वेडेकर विद्यामंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
दूरध्वनी : २५४२ ६२७०

मुद्रण स्थळ :
परफेक्ट प्रिंटस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
दूरध्वनी : २५३४ १२९१
२५४१ ३५४६

## अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १) | निष्ठा जपणारे डॉक्टर ! | डॉ. विजय वेडेकर | ३ |
| २) | कर्तृत्ववान मामंजींची-मी एकुलती एक सून | सौ. सुमेधा वेडेकर | ५ |
| ३) | भगवान श्रीकृष्ण | शं. बा. मठ | ८ |
| ४) | सूची - काही दुर्मिळ ग्रंथांची (पूर्वार्ध) | स्मृती जोशी | १४ |
| ५) | रमंथ | गीतेश गजानन शिंदे | २० |
| ६) | भारतीय सोळा स्मारके | सौ. मंजिरी दांडेकर | २३ |
| ७) | विश्वमोहिनी गीता | आशा भिडे | २८ |
| ८) | साहित्य जगत | शरद जोशी | ३० |
| ९) | परिसर वार्ता | संकलित | ३२ |


या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

*कुटुंबियांच्या सहवासातील डॉक्टर*

# निष्ठा जपणारे डॉक्टर !

बाबांनी १९४२ मध्ये उंबरगाव इथे डॉ. जोशी यांच्याकडे कामाला सुरुवात केली. पण त्यांची खरी कर्मभूमी ठरली, ठाणे. ही गोष्ट आहे १९४३-४४ ची. त्यापूर्वी ते विलेपार्ले इथे व्यवसाय सुरू करू इच्छित होते. पण त्याच दरम्यान ठाणे शहरातील गोखले रोडवरील डॉ. वाडेकर व्यवसायातून निवृत्त झाल्यामुळे त्यांचा तिथला दवाखाना मिळाला. बाबांनी ठाण्याची कर्मभूमी म्हणून निवड केली आणि ६०-६२ वर्षांच्या वैद्यकीय व्यवसायात निष्ठेने आणि श्रद्धेने काम केलं, अगदी शेवटच्या क्षणापर्यंत.

बाबा आणि बाबांच्या पिढीतील लोक यांच्या उदरनिर्वाहाचाच तो व्यवसाय असला तरी आजकालच्या दृष्टिकोनातून जसा व्यवसाय करतात, तसा तो त्यांनी कधीच केला नाही. 'कुटुंब वैद्यकीय सल्लागार' या आता विलयाला जाणाऱ्या संकल्पनेचे बाबा खंदे पुरस्कर्ते होते. त्यांनी ज्यावेळी वैद्यक व्यवसायाला सुरुवात केली, तेव्हा आजारपण येणं हाच एक मोठा आघात असायचा. त्याक्षणी त्या कुटुंबाला केवळ औषधांचाच नव्हे तर आत्मविश्वासाचाही पुरवठा करण्याचं काम करावं लागत असे. रुग्णाबरोबर मैत्रीची गरज असायची. खरं तर आजही ती गरज त्याच प्रमाणात आहे.

वैद्यक व्यवसाय हा त्यांच्या पराकोटीचा आवडीचा विषय होता. शेवटपर्यंत त्यांना कधीही कंटाळा आला नाही. या क्षेत्रात आलेल्या नवनवीन गोष्टी त्यांनी झटकन आत्मसात केल्या. त्याचवेळी स्वदेशीचाही खंदा पुरस्कार केला. रुग्णाला ते भारतीय औषधं देत असत. अगदी नाईलाज असेल तर परदेशी औषधांच्या वाटेला जात असत.

इतर क्षेत्रात बाबांचं कार्य असलं तरी जुने ठाणेकर मात्र त्यांना डॉक्टर म्हणूनच अधिक ओळखतात. बाबांनी १९५० मध्ये हॉस्पिटल सुरू केलं. त्यांच्यापाठोपाठ मी या व्यवसायात आलो. त्यांचा तसा आग्रह नव्हता. पण एकदा माझा निर्णय पक्का झाल्यानंतर मात्र त्यांनी प्रोत्साहन दिलं. माझा मुलगा जेव्हा या क्षेत्रात आला तेव्हाही त्यांना आनंद झाला. अत्याधुनिक तंत्राविषयी त्यांच्याशी त्यांची चर्चा चालत असे. त्यांच्या हयातीत हॉस्पिटलमध्ये दोन वर्ष तीन पिढ्यांनी एकत्रित काम केलं, याचं त्यांना मोठं समाधान वाटत होतं. त्यांच्या वागण्या-बोलण्यातून ते जाणवायचं.

स्वातंत्र्यपूर्व काळातील संस्कारित असं बाबांचं व्यक्तिमत्त्व होतं. त्यामुळे त्यांचा समाजाकडे बघण्याचा एकूणच दृष्टिकोन पूर्णपणे वेगळा होता. ते ठाण्यात आले तेव्हा ठाण्याचा विकास गावाकडून शहराकडे होत होता. या स्थित्यंतरात सगळ्यात महत्त्वाच्या असतात, त्या शिक्षणसंस्था हे त्यांनी जाणलं. ते स्वत: बेताच्या परिस्थितीतून वर आले होते. त्यामुळे गरिबाला शिक्षण घेताना काय यातना होतात, याची त्यांना कल्पना होती.

कोणत्याही क्षेत्रात त्यांनी काम करायचं ठरवलं की ते पहिले सैनिक असत. 'आधी केलं मग सांगितलं' या सूत्रावर त्यांचं काम आधारलेलं असे. साहजिकच त्यांच्या अवतीभवती असलेल्या सहकाऱ्यांमध्येही ही वृत्ती आली. त्यांचीच भूमिका सहकाऱ्यांनी उचलून नेली. या कार्यात कोणताही मानमरातब किंवा सन्मान मिळण्याच्या अपेक्षेने काम करणारी माणसं नसल्याने आणि त्यांनी हाती घेतलेल्या कार्यासाठी जास्तीत जास्त कार्यकर्ते मिळू शकले.


बाबांचं राहणीमान अतिशय साधं होतं. फारसे बोलत नसत आणि सगळ्यात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे सहिष्णुता त्यांच्या ठायी होती. त्यांना निराश झालेलं तर मी कधीच पाहिलं नाही. १९५५-५६ मध्ये ते विद्या प्रसारक मंडळाचे

अध्यक्ष झाले. तर १९७९ मध्ये त्यांनी भारत सहकारी बँकेची स्थापना केली. याशिवाय उत्कर्ष मंडळासारख्या संस्थांच्या उभारणीत त्यांचा वाटा मोठा होता.

संस्कारांचे मूर्तिमंत रूप आमच्या आजूबाजूला वावरत होते. त्यामुळे आमच्यातही ते गुण आलेच. घरात इतका मोठा प्रेरणास्रोत असल्याचा फायदा मला निश्चितच झाला. ते कधीही रागावत नसत. त्यांना अनेक गोष्टी पटत नसत, तरीही ते समजावून सांगत. अर्थात सगळ्यांनी आपल्या मतांशी सहमत असलंच पाहिजे, असा त्यांचा आग्रह नसे. मुळात आपण काही फार जगावेगळं काम करतोय, असा त्यांचा आविर्भाव कधीच नव्हता. आपल्यासारखेच किंवा त्याहीपेक्षा जास्त मोठं काम करणारी व्यक्तिमत्त्वं आहेत याची त्यांना जाणीव होती. हे सूत्र बोलून दाखवणं फार सोपं आहे. बाबांनी तेच आजन्म आचरणात आणलं, यात त्यांचं मोठेपण आहे.

तरुणांनी व्यवसायाभिमुख व्हावं, असा त्यांचा आग्रह असायचा, कष्ट करेल त्यालाच यश मिळेल, ही त्यांची श्रद्धा होती. तीच श्रद्धा त्यांनी आयुष्यभर जपली.

-डॉ. विजय बेडेकर






*कुटुंबियांच्या सहवासातील डॉक्टर*

# कर्तृत्ववान मामंजींची - मी एकुलती एक सून

*जो आवडतो सर्वांना, तोचि आवडे देवाला ॥धृ॥*

*जनसेवेचे बांधून कंकण, त्रिभुवन सारे घेई जिंकून*
*अर्पून अपुले हृद सिंहासन, निज भजतो मानवतेला॥*

*होऊनि पंगु आपुल्या हाती, आंधळ्याची होतो काठी,*
*पायाखाली त्यांच्यासाठी, जो अंथरी निज हृदयाचा ॥२॥*

*तोचि आवडे देवाला, तोचि आवडे सर्वांना ॥ धृ॥*

तो. बाबा माझ्या वडिलांसमवेत होते. माझे वडील कै. डॉ. वझे व ती. बाबा मित्र होते. त्यामुळे ती. बाबा मला सासरे असे कधी वाटलेच नाहीत.

एकत्र कुटुंबात, ४ पिढ्यांच्यात वावरणारी मी नातसून, एकुलती एक सून होते. त्यामुळे ३१ वर्षांच्या सहवासातील असंख्य आठवणी, अनुभव आहेत. येथे मात्र थोडक्यात श्रद्धांजली वाहते.

चार पिढ्यांच्यामुळे, आमच्या घरी, घरातील माणसांचेच वैभव. विशीपासून ते नव्वदीच्या वयातील मंडळी आम्ही एकत्र सुखात नांदत होतो. कर्तव्य, कौतुक, जबाबदारी, कष्ट, आदरातिथ्य, चौकशी इ. जीवनमूल्ये आपोआपच जपली जातायत, याचा अनुभव यायचा. थोडक्यात कुटुंब म्हणजेच शाळा, विद्यापीठ झाले. घरात आले की, खलबत्त्यापासून ते बाळाच्या वाळ्यांचा आवाज, पाहुणे मंडळींना भावून जायचा. एकमेकांच्या सहवासात आमच्या कुटुंबाचा संसाररूपी रथ चाललाय. सुखा-समाधानात चाललाय.

'तुमचं घर छान आहे!' पाहुणे म्हणायचे व आम्ही म्हणायचो,' घरातील मंडळी जास्त छान आहेत.'

पण आता वडीलधारी माणसांच्या सहवासातील 'लहानपण' संपलं.

पहिल्या पिढीतील मी लहान व पुढील पिढीतील सर्वांत मोठी सून, अशी दुहेरी भूमिका पार पाडताना ३१ वर्षे कशी गेली, कळलेच नाही.

ही थोर माणसं कशी घडली, कशी वागली, हे आम्ही रोज जवळून बघितले. त्यांच्या सहवासात अनेक वर्षे राहणं हे मोठं भाग्य मला, आम्हाला लाभले. 'चालते-बोलते आदर्श' घरातच आहेत, असे मी मुलांना सांगे. मातृदेव, पितृदेव, आचार्यदेव, अतिथीदेव, आत्मदेव यांची पूजा आमच्या घरी होते. ती बाबा करायचे, असे वाटते. भारतीय संस्कृतीतील एकत्र कुटुंब पद्धतीमुळे आमच्या घरात जणू काही विविध स्वभावाचे इंद्रधनुष्यच पडायचे. या समारंगात अनेक शैक्षणिक, सामाजिक, राजकीय, कौटुंबिक सभा, उत्सव होतात. विविध क्षेत्रातील मित्रपरिवार, विविध देशांतील मंडळी, अगदी गोवळपासून ते अमेरिकेतील सुसंस्कृत मंडळी, आमच्याकडे येऊन-राहून, सुखात-समाधानात जातात, हीच आमची संपत्ती. विविध मंडळींच्या समारंगात वैचारिक खाद्य, वैचारिक कारंजी उडतात आणि या मंडळींचे आदरातिथ्य, मोठ्या मंडळींना जवळून बघण्याचे भाग्य माझ्या दिवंगत सासूबाई व मला लाभले. ही आमची जीवनशैलीच बनली. घरची व दारची माणसं, हेच बेडेकरांचे वैभव, समृद्धी झाली. लक्ष्मी, सरस्वतीबरोबरच आमच्या घरी 'श्री'चेही वास्तव्य आहे. अशी प्रसन्न, वैचारिक इंद्रधनुष्य पडणाऱ्या वास्तूत मग

'हे आमुचे घर, जगावेगळे आहेच सुंदर'

सहज म्हणावेसे वाटते. संसार सुखाचा होत नसतो, तो सुखाचा करायचा असतो - ही गृहिणींची गुरुकिल्ली आहे की नाही ?

अहो माझ्या बाबतीत तर,
'सुख म्हणजे दुसरं काय असतं?
काय पुण्य असतं की जे घरबसल्या मिळतं !'
असे सदैव मी अनुभवते.

'शिवशक्ति'मधील ती. बाबांचं हसरं, प्रसन्न, शांत व्यक्तिमत्त्व. ती. बाबांचे अनेक गुण, अनेक वैशिष्ट्ये, अष्टपैलू व्यक्तिमत्त्व.

बालपणापासून भयंकर कष्टाचे जीवन. भरपूर कष्ट व जबरदस्त आत्मविश्वासाने त्यांनी मोठी-मोठी ध्येयं गाठली. कष्टाचे जीवन त्यामुळे 'जे पाहिजे ते मिळवायचे' ही परिस्थितीने निर्माण झालेली वृत्ती व होकारार्थी वृत्तीने कामास लागणे, ही निग्रही वृत्ती. त्यांची कामावरील श्रद्धा अखेरपर्यंत होती. ६० वर्षे सातत्याने डॉक्टरी व्यवसाय करणारे ती. बाबा, 'फॅमिली डॉक्टर', कामावर श्रद्धा असणारे डॉक्टर म्हणून ओळखले जायचे. पूर्वी वेळप्रसंगी स्वत: भूल देऊन 'सिझर' करणारे बाबा अलीकडे जेवायच्या टेबलावर ३ पिढ्यांच्या गप्पांत रंगायचे. आमच्या सर्वांच्याच भाग्याचे, मेहनतीचे ते द्योतक होते. 'शूरा मी वंदिले'. ती. बाबा शूर होते. भीती, राग, आळस त्यांच्या जीवनात जवळजवळ नव्हतेच. कर्तृत्व, स्वभाव व नशीब अशा छान संगमाने त्यांचे जीवन समृद्ध होते.

नातवंडे म्हणजे त्यांचे सर्वस्व होते. ते समाधानाने म्हणत, माझ्यासारखी व विजयसारखी 'दृष्टी' फार कमी जणांना असते. स्वत:चं वेगळं व्यक्तिमत्त्व असणारा ध्येयनिष्ठ, तत्त्वनिष्ठ असणारा मुलगा, मुली, जावई हे त्यांचं समाधान होतं.

मानवी जीवनाचा महत्त्वाचा घटक म्हणजे 'शिक्षण'. शिक्षण क्षेत्रात त्यांनी ठाण्यात एक साम्राज्यच उभारले. समवयस्क, तत्कालीन विचारांचे, लहान-मोठ्या अनेक असंख्य व्यक्तींच्या सहकार्याने हे घडले गेले आहे, याची त्यांना पूर्ण जाणीव होती. शुश्रुषालय, शाळा, कॉलेज, बँक इ. संस्था उभारत असताना कै. सासूबाई म्हणायच्या, 'बेडेकरांनी जन्मापासून ते शिक्षणापर्यंत ठाण्यात सोय केली आहे. लोकसभेत निवडून आले नाहीत, ते एका दृष्टीने बरे झाले.'

सामाजिक क्षेत्रात वावरणारे ती. बाबा घरातही स्वयंसिद्धच. आमच्या लग्नात लक्ष्मीपूजनाला मला आवडतात म्हणून 'चिंचपेट्या' घेणारे, नातवंडांबरोबर कॅरम खेळणारे, नातवंडांबरोबर परदेशी प्रवास करणारे, खरेदी करणारे, नातवंडांना आंघोळ घालणारे, मुलांच्यात रमणारे, खळाळून हसणारे आदर्श आजोबा.

'डाळिंब्या सोलणारे, वाटाणे परतणारे, लसूण-शहाळं चटणी करणारे; कांदा भाजणारे, आंब्याच्या दिवसांत पहिली पेटी आणणारे, सर्वांना पेट्या वाटणारे, हरितालिकेला सर्व नातेवाईकांकडे शहाळी व केळी पाठवणारे मामंजी आता नाहीत. हल्ली रोज सकाळी पहिला पेपर ते 'सकाळ' वाचीत. १५ ऑगस्ट व २६ जानेवारीला तिरंगा झेंडा गच्चीत लावताना 'स्वदेशप्रेम', स्वातंत्र्यापूर्वीच्या गप्पा रंगायच्या. नियमितपणा, कितीही आवडलं तरी मोजकं जेवणं, लहानपणी कमावलेलं शरीर हे साधेच, पण अवघड तत्त्व त्यांच्या यशस्वी जीवनाचं सूत्र होते, असे वाटते. अध्यात्माचे फारसे ग्रंथ न वाचता ते सहज आनंदी वृत्तीने, कर्तव्यकर्म करीत असताना वाटायचे, संसारातच त्यांनी परमार्थ साधलाय. सदैव सज्ज असलेलं साधंच, पण टापटीप घर त्यांना आवडे.

सर्वांच्या जेवणाची चौकशी करून मग स्वत: जेवायचे. स्वत:चे काम स्वत: करण्याकडे त्यांचा कटाक्ष असायचा.

'सुमेधा, आपलं घर, पसारा मोठा आहे. तू छान सांभाळतेस तू वेगळीच आहेस. तू चांगली आहेस, तुला गाण्याची देणगी आहे.' अशी शाबासकीची पावती द्यायचे.

असंख्य, असंख्य आठवणी आहेत. हल्ली थंड हवेच्या ठिकाणी 'सावित्री'मध्ये विश्रांती घेणारे मामंजी विविध विषयांवर गप्पा मारायचे. निसर्गापासून ते श्रद्धा-अंधश्रद्धा, कोकणातील जुन्या आठवणी, पुढील कामे, तरुण पिढी, 'स्त्री'च्या उद्धाराशिवाय देश प्रगत होणे कठीण, अशा अनेक विषयांवर चर्चा करणारे ती. बाबा आज आपल्यात नाहीत.

पण वाईटातून चांगले भाग्य, पुण्य म्हणजे पुढची चौथी पिढी, 'चि. जान्हवी' , पण तिचे दर्शनही त्यांना घडले. खरोखरीच !

'मंगलदर्शन पूर्णविराम, श्रीराम जयराम जयजयराम' येथे ज्ञानेश्वरीतील ओवी आठवते.

*फुले वेचिता बहरु, कळियासी आला, मोगरा फुलला।*
*इवलेसे रोप, लावियले द्वारी, तयांचा वेलू गेला गगनावरी*

*मनाचिये गुंती, गुंफियेला शेला, बाप-रखुमादेवीवरी, विठ्ठले अर्पिला*

*मोगरा फुलला, मोगरा फुलला ॥*

कर्मांवर श्रद्धा असणाऱ्या ती. वाबांना या जन्मीच मोक्ष मिळाला असणार.

त्यांना मुक्ती मिळो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना व एका दानशूरास,

शतश: प्रणाम !

सौ. सुमेधा वेडेकर

B. J. MEDICAL SCHOOL, POONA
**GYMKHANA MANAGING COMMITTEE**
1940-41



# भगवान श्रीकृष्ण

*भगवान श्रीकृष्णाचे वास्तव चरित्र काय होते, याचा अभ्यासपूर्ण विचार मांडणाऱ्या लेखमालेतील हा तिसरा लेख*
*- संपादक*

(लेखांक तिसरा)

## कृष्ण जन्मपूर्वीची परिस्थिती

श्रीकृष्ण वसुदेव व देवकी यांचे सुपुत्र. कंसाच्या धाकामुळे वसुदेवांनी कृष्णाला नंद नामक गवळ्यांच्या पुढाऱ्याच्या स्वाधीन करून गुप्तपणे वाढविले. बालपणाचा काळ संपला. कृष्ण कंसाला ठार मारून यादव या नात्याने उघडपणे वावरू लागला. श्रीकृष्णाचा जन्म गणराज्यात झाला. यादवांना राजा होण्याचा अधिकार नाही, असा ययातीने यदूला शाप दिल्यामुळे यदू शासनभ्रष्ट झाला. यादवांचे गणराज्य मथुरेत होते. यदू हा मूळ पुरुष. त्याच्यापासून यदुवंश निर्माण झाला. त्यात वृष्णी व अंधक या दोन प्रमुख गणांचे मथुरेत राज्य होते. अंधकापासून काशीराजाच्या कन्यकेच्या ठिकाणी कुकर, भजमान, शर्मा, कम्बळ अशी चार मुले झाली. ज्येष्ठ मुलगा कुकर त्याला धृष्णु, धृष्णूला कपोत, कपोतापासून तित्तिरी, त्याचा मुलगा पुनर्वसू. पुनर्वसूला आहुक आणि आहुकी असे जुळे झाले. आहुकाला काशीराज कन्येपासून देवक व उग्रसेन या नावाची दोन मुले झाली. या देवकाची मुलगी देवकी ही श्रीकृष्णाची माता होय. उग्रसेनाचा सर्वांत मोठा मुलगा कंस. वृष्णी कुळात श्रीकृष्णाचा जन्म झाला. तसेच वृष्णी कुळातच बभ्रू हेही जन्मले. वृष्णी कुळातील शूर नावाच्या विख्यात व्यक्तीचे वसुदेव हे चिरंजीव. अंधक कुळातील देवकी वृष्णी कुलातील वसुदेवाला देण्यात आली. वृष्णी व अंधक यांचा संबंध श्रीकृष्ण जन्मापूर्वी जुळून आला होता. म्हणून अंधक वृष्णी संघराज्य एकरूप झाले. जरासंध अंधकांचा नायक. अक्रूर वृष्णींचा नायक. हे दोघेही गणराज्य सभेत होते. यांची सुधर्मा नावाची लोकसभा होती. तेथे गणप्रमुख जमत.

वृष्णी गणातील यादव अंधक राज्यात अधिकारावर होते. त्यातील दोन मुख्य व्यक्ती, एक वसुदेव वृष्णी संघाचा पुढारी, दुसरा अक्रूर. वसुदेवावर कंसाचा रोष होता. ज्ञातिकार्याची सिद्धी व्हावी, म्हणून उग्रसेनाच्या हिताला वसुदेव दक्षतेने जपत होता. ते कंसाला सहन झाले नाही. मात्र अक्रूराशी त्याचे वाकडे आले नाही, कारण अक्रूर वारा येईल तशी पाठ फिरवणारा होता. अंधक राज्याचा गणप्रमुख उग्रसेन. त्याचा वडील मुलगा कंस हा पराक्रमी होता. जरासंधाने आपल्या अस्ति व प्राप्ती या दोन मुली कंसाला दिल्या. जरासंधाचा तो जावई होताच. त्याच्या पाठीशी मगधाचे महान सामर्थ्य उभे राहिले. त्याने गण नष्ट करून स्वत: सत्ता काबीज करण्याचा प्रयत्न चालविला. गणराज्याचे सदस्य त्याला विरोध करू लागले. मगधाच्या सहाय्याने विरोध मोडून काढला. या संघर्षात आपला टिकाव लागावा म्हणून अंधक गणातील प्रमुखांनी वृष्णी संघाशी नाते जोडले. उग्रसेनाची मुलगी सुतनु हिचा विवाह वृष्णी कुळातील अक्रूराशी करण्यात आला. अधिक जिव्हाळ्याने दोन्ही संघ एकत्र आले. कंसाने आपला पिता उग्रसेन याला बंदिस्त करून मथुरेचे राज्य बळकावले.

गोकुळातील वास्तव्यात मथुरेतील गणराज्यावरील कंसाच्या आक्रमणाने अनिवार्य संकट नष्ट करण्याचा पद्धतशीर विचार चालू होता. वसुदेवपुत्र व्रजात आहे आणि एखाद्या अग्नीप्रमाणे तो वाढतो आहे, हे पाहून कंसाला अतिशय उद्वेग उत्पन्न झाला व त्याला भय वाटू लागले. पुतनेचे मरण, कालियाचा पराजय, गोमुख व प्रलंब यांचा वध, गोवर्धन प्रकरण, अरिष्ट इत्यादींचा वध, यादवांशी वाढत चाललेले शत्रुत्व यांचा विचार करून त्याची भीती वाढली. त्याचा तोल जाऊ लागला. आता कंसापुढे दोनच मार्ग होते. कृष्णाचा नाश अगर जरासंधाच्या आश्रयाला जाऊन राहणे.

वसुदेवाला डिवचण्यासाठी कृष्णाच्या विनाशाची योजना तत्काळ आखली. भरसभेतच कृष्णाला मथुरेत आणण्याची अक्रूराला आज्ञा केली. परंतु कृष्णाने हा कंसाचा डाव त्याच्यावरच उलटविला. त्याच्या मल्लांना मारून कंसाचाही भरसभेत कृष्णाने वध केला. अत्याचाराचे राज्य संपले. धर्मविजयाचा पहिला किरण उमटला. गणराज्यावरील एकाकी अरेरावी संपली. धर्मसंरक्षणात झालेल्या परमेश्वरी अवताराच्या कर्तृत्वाचे पहिले पाऊल पडले. पशुत्वाने भरलेल्या जगताच्या डंक्यावर पहिले टिपरू पडले. या यज्ञकुंडात अरेरावी कंस व त्याची सुलतानी राजवट यांची आहुती पडली. कंसवधाच्या प्रकरणातून श्रीकृष्णाच्या अंगचे निर्भयता, आत्मप्रतीती, स्थिरचित्तता, योग्यवेळी उत्थान, दीर्घसूत्रीपणाचा अभाव, सामाजिक अधिष्ठान इत्यादी गुण व्यक्त झाले. यानंतर श्रीकृष्ण उज्जयनीला सांदिपन गुरुंकडे विद्याध्ययनासाठी आपल्या मोठ्या बंधूसह जाऊन राहिला. विद्याध्ययनानंतर गुरूचा हिरावून नेलेला मुलगा परत आणून देण्याचे मान्य केले. शंखोद्धार बेटावर जाऊन तेथील असूराला ठार मारून त्या मुलाला परत आणले. तेथून ते उभयता मथुरेला परतले.

**जरासंधाच्या हालचाली**

जरासंध हा साम्राज्यवादी होता. त्याने धर्मऐवजी बळाला महत्त्व दिले. हा आसुरी साम्राज्यवाद वाढविण्याचा त्याने सपाटा चालविला. आपल्याला कोणीही विरोध करू नये, म्हणून जुने राजवंश नष्ट केले. उग्रदंडाच्या भयाने आपले दास केले, असे त्याच्या साम्राज्याचे स्वरूप होते. चंद्र व सूर्यवंशाची जी शंभर कुळे होती, त्यातल्या ८६ राजकुलाना आपल्या पराक्रमाने जिंकले. यज्ञीय पशू म्हणून बलिदान करण्यासाठी या पकडून ठेवलेल्या राजावर प्रोक्षण करून ठेवले. अद्याप १४ राजांना जिंकावयाचे राहिले होते. शंभर संख्या पूर्ण होताच राजबळीचा तो नरमेध समारंभ व्हावयाचा होता. राजसंघ लवकर फुटत नसल्याने त्यांच्यात भेद पाडण्याचे उद्योग चालू होते.



**मथुरेवर आक्रमण**

अस्ति आणि प्राप्ती या दोन मुलींनी आपल्याला वैधव्य का आले, हे जरासंधाला सांगितले. संतप्त झालेला जरासंध प्रचंड सैन्यानिशी मथुरेवर चाल करून गेला. जरासंधाला यावेळी पराभव पत्करावा लागला. जरासंधाने पुन: सैन्य जमवून मथुरेवर स्वारी केली. याहीवेळी त्याचा पराभव झाला. अशा एकंदर सतरा वेळा जरासंधाने मथुरेवर स्वाऱ्या केल्या. हंस व डिंभक या सेनापतींमुळे जरासंध अद्वितीय होता. एका हंस नावाच्या राजाला बलरामाने मारले. ही बातमी डिंभकाला कळताच आपला मित्र हंस मेला, असे समजून त्याने यमुनेत उडी टाकून प्राणार्पण केले. डिंभकाचा मृत्यू होताच हंसाने आपला मित्र गेल्याने त्याने पण जीव दिला.

अठराव्या स्वारीच्या वेळी यादवांची एक विशेष सभा भरली. त्या सभेत विकद्रु नावाच्या यादवाने श्रीकृष्णाला उद्देशून म्हटले - 'जरासंध अत्यंत बलाढ्य असून सर्व राजांमध्ये अग्रेसर आहे. आपल्या जवळची युद्धसामुग्री तोकडी आहे. शहराभोवती एकच तटबंदी आहे. सतरा वेळा झालेल्या स्वाऱ्यांमुळे ती ढासळलेली आहे. आपण असुरक्षित आहोत. अन्नाचा पुरवठा कमी आहे. अशा स्थितीत मथुरा जरासंधाचा प्रतिकार करू शकेल असे नाही. पराभव झाल्यास गणराज्य संपले असेच होईल. आपण आमचे नेते, आपणच याचा विचार करावा.'

यावर श्रीकृष्ण म्हणाला - 'मी स्वत: बलरामासहित मथुरेतून गोमंत पर्वताकडे निघून जातो. जरासंधाची स्वारी ही मुख्यत: माझ्यावर असल्याने मी निघून गेलो असता तो मथुरेवर स्वारी न करता माझा पाठलाग करील. त्या अवधीत सर्व यादवांना मथुरा सोडून द्वारकेकडे येता येईल, असे करण्याचे आम्ही ठरविले आहे.'

### श्रीकृष्णाचा अचूक अंदाज

जरासंधाने आपला मित्र राजा कालयवन यास श्रीकृष्णावर स्वारी करण्यास पाठविले. श्रीकृष्णास कालयवनाशी गुंतवावे व आपण पिछाडीतून हल्ला करून शत्रू संपवून टाकावा, असा बेत जरासंधाने केला. श्रीकृष्णाने विचारपूर्वक बलरामाशी सल्लामसलत करून एकटाच कोणतेही आयुध न घेता मथुरेतून बाहेर पडला. कालयवनाने त्याचा पाठलाग केला. श्रीकृष्ण दूर एका गुहेत गेला. तोही त्या गुहेत शिरला. त्या गुहेत श्रीकृष्णाच्या तेजाने तो दग्ध झाला. त्याच्या सैन्याचा विध्वंस करून ठरल्या योजनेरूप श्रीकृष्ण बलरामासहित मथुरेच्या बाहेर पडला आणि गोमंत पर्वताकडे आपली दृष्टी वळविली. जरासंधाने मथुरेकडे दुर्लक्ष करून गोमंत पर्वताकडे आपली दृष्टी वळविली.

गोमंत म्हणजे हल्लीचा गिरनार पर्वत होय. कृष्ण सापडत नाही, हे पाहून जरासंधाने त्याला त्या पर्वतावर घेरले व चहूकडून आग लावून दिली. आग लागलेली पाहताच श्रीकृष्ण, बलरामसहित वेगळ्याच वाटेने काठेवाडात उतरला. तेथून रैवतक (गिरनार) पर्वताजवळील प्रभास पट्टण येथे येऊन वास्तव्य केले. यादव कुटुंबे तेथे येऊन राहिली. कुशस्थळी येथे श्रीकृष्णाने किल्ला बांधला. हा किल्ला समुद्रात होता. ही मूळ द्वारका, सध्याची द्वारका येथून १७५ मैल दूर आहे. ती श्रीकृष्णाने शाल्ववधानंतर वसविली. सांप्रत बेट द्वारका म्हणतात. त्याचे पूर्वीचे नाव शंखोद्धार. तेथेच गुरु सांदिपनी यांच्या मुलाला श्रीकृष्णाने सोडविले. पाचजण राक्षसाला मारले व पांचजन्य विख्यात शंख मिळविला. जरासंधाने कृष्णाचा नाद सोडून दिला.

### रुक्मिणी स्वयंवर

रुक्मिणीचे हरण करून श्रीकृष्णाने अनेक गोष्टी साध्य केल्या १) रुक्मिणीच्या मनासारखे तिच्याशी लग्न २) संस्थापनेसाठी भीष्मक राजकुटुंबाशी संधान ३) जरासंधाचा पराभव. हा प्रसंग अनेक कवींच्या प्रतिभेचा वर्ण्यविषय झाला आहे. कवी सामराज ते श्री एकनाथांपर्यंत अनेक कवींच्या प्रतिभेने त्यावर अलंकार चढविलेला आहे. विदर्भ देशाचा राजा भीष्मक याची रुक्मिणी कन्या होय. राजा भीष्मक अत्यंत बलवान, संपन्न होता. मगध राजा जरासंध याचा अनुचर व मांडलिक राजा होता. याला पाच मुले, त्यात एक मुलगी. मोठा मुलगा रुक्मि इतर रुक्मरथ, रुक्मबाहू, रुक्मेशी व मुलगी रुक्मिणी. ती अतिशय सुंदर व लावण्यसंपन्न होती. तसेच पित्याची अतिशय लाडकी होती. त्याच्याकडे अनेक तपस्वी मंडळी येत असत. त्यांच्याकडून अनेकांची माहिती मिळत असे. श्रीकृष्ण जावयासाठी योग्य आहे, असे राजाला वाटले. या कन्येच्या मनात श्रीकृष्णाची भावमूर्ती तयार झाली. रुक्मी हा खास जरासंधाच्या पंखाखाली होता. त्याला श्रीकृष्ण हा रुक्मिणीचा पती असावा असे वाटले नाही. श्रीकृष्णाचा आतेभाऊ शिशुपाल याला वर ठरविला. रुक्मिणीला हे आवडले नाही. तिने सुदेव नावाच्या ब्राह्मणाबरोबर श्रीकृष्णाला संदेश पाठविला. त्या ब्राह्मणाने संदेशाचे पत्र श्रीकृष्णाला दिले. तिने लिहिले होते -

*श्रुत्वा गुणान् भुवनसुंदर शृण्वतां ते ।*
*निर्विश्यकर्ण विवरैः हरतोऽङ्गतापम् ।*

*रूपं दृशां दृशिगतां अखिलार्थ लाभम् । त्वयि*
*अच्युत आविशति चित्रं अपत्रपं मे ।*

*मां राक्षसेन विधिना उद्वह वीर्यशुलकाम् ।*
*पूर्वेद्युः अस्ति महतो कुलदेवियात्रा ।*

*यस्यां बहिः नववधू गिरिजां उपेताम् ।*

श्रीकृष्णाने ब्राह्मणासह आपल्या रथातून विदर्भाला प्रयाण केले. श्रीकृष्णाचे प्रयाण झालेले कळताच बलराम यादवसेना घेऊन त्याच्या मदतीला धावला.

रुक्मिणी स्वयंवरासाठी जरासंध, शाल्व, देवचक्र, पौंड्रक इत्यादी मोठे बलवान राजे आले होते. श्रीकृष्ण येत असल्याचे त्यांना कळले होते. ते त्यासाठी सिद्ध झाले होते. आपण पाठविलेला ब्राह्मण अद्याप का आला नाही, या

विचाराने रुक्मिणी चिंताक्रांत होती. इतक्यात तो ब्राह्मण दिसला. भाग्य उजळल्यासारखे तिला वाटले. राजाने श्रीकृष्णाचे स्वागत केले. दुसऱ्या दिवशी मुलगी देवीदर्शनाला जावयाची म्हणून सर्व राजेलोक आपआपल्या वाहनातून संकेतस्थळी गेले.

रुक्मिणी अंत:पुरातून अंबिकेच्या देवळाकडे जावयास निघाली. कडेकोट बंदोबस्त होता. पार्वतीच्या दर्शनासाठी ती पायीच निघाली. मनात कृष्णाचे ध्यान चालू होते. तेथे श्रीकृष्ण आल्याचे कळल्यामुळे अनेक राजेलोकांनी योद्धे रक्षणार्थ घेतले होते. मंदिराजवळ येताच हातपाय धुतले व रुक्मिणी मंदिरात गेली. देवीला वंदन केले. हात जोडून प्रार्थना केली, 'माते, तुझ्या कृपेने मला श्रीकृष्णच पती म्हणून लाभोत.' ती मंदिराबाहेर पडली. श्रीकृष्णाने आपला गरूड चिन्हांकित रथ तिच्याजवळ आणला. तिला रथात घेऊन आडव्या आलेल्यांचा पराभव करून तो रथ द्वारकेच्या मार्गे वळविला. जरासंधाला हा अपमान वाटला. बलराम व यादव सैन्याने या योध्द्यांचा खरपूस समाचार घेतला. रुक्मीने प्रतिज्ञा केली, मी श्रीकृष्णाला ठार मारून रुक्मिणीला परत आणीन. तोवर राजधानीकडे येणार नाही. द्वारकेत विवाह मोठ्या थाटाने झाला.

## दुसरी घटना - सुभद्राहरण

ही गोष्ट श्रीकृष्णाने आपल्या कल्पकतेने घडवून आणली. अत्यंत नाजूक व हृदयस्पर्शी अशी ही घटना होती. या प्रश्नावर पांडव व यादव यांचे सदाचे व्दंद उत्पन्न होऊन प्रत्यक्ष यादवांच्या गणमंडळीतसुद्धा भेद उत्पन्न व्हावा, इतकी स्फोटक गोष्ट असताना श्रीकृष्ण बावनकशी सोन्याप्रमाणे पूर्णपणे यशस्वी झाले. त्यांचा प्रभाव व त्यावरील विश्वास या दोन्ही गोष्टी विलक्षण रीतीने सिद्ध झाल्याचे दृष्टोत्पत्तीस येते.



यादवांना श्रीकृष्णाने म्हटले - एकट्या अर्जुनाने पराक्रमाने तुम्हाला जिंकले व सुभद्रेला नेले तर तुमच्या पराक्रमाचा नक्षा उतरेल आणि मिळविलेली कीर्तीही धुळीला मिळेल. हे लक्षात ठेवा. श्रीकृष्णाचे हे बोलणे ऐकताच सभेचा रंग पालटला व यादवांनी त्याच्या म्हणण्याप्रमाणे अर्जुनाला बोलावणे पाठवून कृष्णाच्या इच्छेप्रमाणे सर्व घडवून आणले. या घटनेमुळे पांडवांना यादव कुळांचा आधार मिळवून द्यावा व त्यांचे मनोबल वाढवावे, हा हेतू श्रीकृष्णाने साध्य केला. त्याचे नेतृत्व इतके प्रभावी ठरले. महापराक्रमी यादव व पांडव यांच्यात संबंध प्रस्थापित झाले. ही दोन्ही श्रीकृष्णाची धर्मसंस्थापनेच्या कार्यातील साधने ठरली.

## श्रीकृष्णाचा आदर्श

आदर्श पुत्र, आदर्श बंधू, आदर्श मित्र, आदर्श शत्रू, आदर्श वल्लभ इत्यादी.

**आदर्श पुत्र** - आपल्या पित्याचा दुस्वास करणाऱ्या दुष्ट सत्ताधीशाला ठार मारून पित्याच्या संबंधातील अन्यायाचा सत् पुत्राला योग्य असाच सूड घेतलेला असून यानंतर यादवांच्या गणराज्याचे मुख्य म्हणून नेमले. याप्रमाणे वसुदेवाचे हे स्थान योग्य रीतीने सांभाळलेले होते.

**आदर्श बंधू** - त्याचे व बलरामाचे परस्पर प्रेम वाखाणण्यासारखे होते. आदर्श बंधुप्रेमाचे एक उपमान म्हणून बनून राहिले असे आढळून येते.

**आदर्श मित्र** - त्याच्या वैयक्तिक व राजनैतिक अशा दोन्ही प्रकारच्या जीवनात दृष्टोत्पत्तीस येतात. वैयक्तिक जीवनातील उत्कृष्ट उदाहरण सुदाम्याचे चरित्र. श्रीकृष्णाचा विख्यात असलेला मित्र म्हणजे अर्जुन. या उभयतांचे मित्रत्व अतूट होते.

अर्जुन म्हणजेच मी, मी म्हणजे अर्जुन. आमच्यात भेद नाही. योऽहंतं अर्जुनं विद्धि ।

योऽर्जुनः सोऽहमेव तु । जो कोणी पांडवांचा द्वेष

करतो तो माझाही द्वेष करतो. जो त्याला अनुकूल आहे तो मलाही अनुकूल आहे.

**आदर्श वल्लभ** - अनेक स्त्रियांशी त्याला विवाह करावे लागले. श्रीकृष्णावर त्याच्या पत्नींचे अपार प्रेम होते. तत्कालीन रूढीच्या अनुरूप तसेच राजकीय वा अन्य कारणास्तव श्रीकृष्णांनी आठ विवाह केले. सहस्त्रावधी स्त्रियांशी केलेला विवाह हा नरकासुराच्या बंदीतून सोडविलेल्या स्त्रियांना सामाजिक प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठी होता. इंद्रियजय केवळ आध्यात्मिक अवस्थेतील साधनसंपत्ती आहे, हा समज अत्यंत चुकीचा आहे.

याबद्दल आर्य चाणक्य म्हणतो - राज्यमूलं इंद्रिय जय: । जितात्मा सर्वार्थै: संयुज्यते ।

राज्यप्राप्तीचे मूळ इंद्रियजय होय.

**इंद्रियजय** - शिशुपालाचे शंभर अपराध पोटात घातले. हा इंद्रियजय होता. निर्लोभिता मागोमागच अलौकिक मानापमानातीतेची त्याची धारणा मनाला स्तिमित करते. पांडवांशी संबंध प्रस्थापित करावयाचा आहे, असे ठरल्यावर स्वत: होऊन तो युधिष्ठिराकडे गेला. उत्तम फळ पदरात पडावे म्हणून स्वत: ब्राह्मणाचे पाय धुण्याचे काम पत्करले.

**दैवी सामर्थ्य** - द्रौपदीच्या आर्त हाकेला गुप्तरूपाने प्रतिसाद दिला व तिची लाज राखली. त्यानी तीन वेळा विश्वरूप दर्शन घडविले. १) धृतराष्ट्राच्या सभेत सभासदांना दाखविले. २) गीतेच्या अकराव्या - अध्यायात अर्जुनाला दाखविले. ३) अश्वमेध पर्वात उत्तंक ऋषीला दाखविले.

उत्तरेच्या मुलाला सजीव केले, ही घटना त्याच्या चरित्रातील गूढत्व दर्शविते. महाभारताच्या अश्वमेध पर्वात ही घटना वर्णिली आहे. अश्वत्थाम्याच्या ब्रह्मास्त्राने मेलेल्या राजा-परीक्षिताला श्रीकृष्णाने आपल्या सामर्थ्याच्या प्रभावाने जीवदान दिल्याचे कथन आले आहे. परिक्षिती हा पांडवांचा वंशतंतू असल्याने त्याला मरू न देणे, ही गोष्ट अत्यंत आवश्यक होती. त्याचसाठी व्यासांच्या आश्रमात अश्वत्थाम्याने उत्तरेच्या गर्भावर ब्रह्मास्त्राचा प्रयोग करण्याचे आपले मनोगत व्यक्त केले. तेव्हा तुझे मनोरथ मी विफल करेन, असे श्रीकृष्णाने त्याला सांगितले होते. आपल्या निश्चयानुसार त्याला जिवंत केले. पण त्यासाठी त्यांनी जी साधने वापरली ती सामान्य व्यक्तीला तरी विस्मयाचा धक्का देणारी वाटतील. अंत:पुरातील कोलाहल ऐकून श्रीकृष्ण उत्तरेच्या राहण्याच्या ठिकाणी आले -

*श्रुत्वा स तस्या विपुलं विलापं पुरुषर्षभ: ।*
*उपसृत्य तत: कृष्णो ब्रह्मास्तं प्रत्यसंहरत् । १६*
*प्रतिजज्ञे च दाशहि तस्य जीवितमच्युत: ।*
*अब्रवीत्च विशुद्धात्मा सर्व विश्रामयन् जगत् । १७*
*न ब्रवीमि उत्तरे मिथ्या सत्यमेतत् भविष्यति ।*
*एष संजीवयाम्येनं पश्यतां सर्व देहिनाम् । १८*
*नोक्तपूर्वं मयामिथ्या स्वैरेषु अपि कदाचन ।*
*न युद्धांत् परावृत्त: तथा संजीवतां अयम् । १९*
*इत्युक्तो वासुदेवेन स बालो भरतर्षभ ।*
*शनै: शनै: महाराज प्रास्यंदत सचेतन: । २४*

***अध्याय ६९***

उत्तरे, मी खोटे बोलत नाही. माझी प्रतिज्ञा खरीच होईल. सर्व लोकांसमक्ष मी याला जीवदान देतो. मी आजवर थट्टेतदेखील खोटे बोललो नाही. मी युद्धापासून कधीही परावृत्त झालो नाही. या पुण्याच्या सामर्थ्याने हा जिवंत होईल. श्रीकृष्णाच्या तोंडून याप्रमाणे शब्द निघाल्यावर तो मुलगा जिवंत होऊन हळूहळू हालचाल करू लागला.

श्रीकृष्णाच्या तोंडून निघालेली वाणी सत्याच्या सामर्थ्याने इतकी भरलेली आहे की, तिच्या प्रभावाने प्रकृतीच्या प्रभेवर मात करून मृताला संजीवन दिले आहे. जरासंधाच्या अठराव्या आक्रमणाच्या वेळी श्रीकृष्णाने प्रत्यक्ष युद्धाच्या रणघाईतून पलायन केले होते, असा उल्लेख आहे मग 'न च युद्धात् परावृत:' याचा अर्थ काय लावावयाचा? या गोष्टीची वेगळी संगती असली पाहिजे.

मी असल्यामुळे जरासंध वारंवार मथुरेवर आक्रमण करतो. मीच मथुरा सोडून गेल्यास मथुरावासीयांचा त्रास टाळता येईल, हा विचार करून श्रीकृष्णाने मथुरा सोडली. सर्व यादवांना द्वारकेस येण्यास सांगितले. ही युद्धनीति आहे, याला पलायन म्हणता यावयाचे नाही. त्याला आपल्या वागण्याने मथुरावासीयांचे हितच करावयाचे होते.

मी मिथ्या भाषण केले नाही, याचाही विचार झाला पाहिजे. वरून पाहता ही प्रतिज्ञा श्रीकृष्ण चारित्र्याशी विसंगत वाटते. खोलवर विचार केला पाहिजे. श्रीकृष्ण सत्याची व्याख्या करताना म्हणतात, 'यत् भूत हितं अत्यंत एतत् सत्यं मतंमम ।' जेथे सर्व भूतमात्रांचे आत्यंतिक हित साधले जाते, त्याला सत्य म्हणावे असे माझे ठाम मत आहे. या संदर्भात श्रीकृष्णाची वरील दोन्ही वचने यथार्थ आहेत. कारण सत्य वा असत्य यांचा पडताळा या व्याख्येनुसार पाहावा लागेल.

अनेक गूढ गोष्टी त्याच्या जीवनात घडलेल्या आहेत. त्यापैकी ही एक. रासक्रीडा. राधा-श्रीकृष्ण संबंध याविषयी अनेक लोकांनी गूढ उकलविण्याचे प्रयत्न केले आहेत. अद्याप चर्चा चालूच आहे. यासंबंधी वेगवेगळे प्रवादही निर्माण होत आहेत. उपासनेच्या क्षेत्रात या गोष्टींचा समावेश झालेला आहे. या मधुर भावनेच्या उपासनेचे अत्यंत महत्त्व आहे. श्रीरामकृष्ण परमहंस, महान् भगवद्भक्त श्री गौरांगप्रभू, महाराष्ट्रातील श्री गुलाबराव महाराज, राजस्थानची संत मीरा व अनेक महान संत या विशिष्ट भावाच्या उपासना संप्रदायाचे आचरण करताना दिसतात. ही व्यक्तिमत्त्वे या उपासनेने महत्पदाला पोहोचली आहेत. राधा-कृष्ण संबंधी मधुरा-भक्ती या संदर्भातूनच विचार करणे अगत्याचे आहे. अन्यथा हे गूढ उकलणार नाही.

(क्रमशः)

**शं. बा. मठ**
६, कुमार आशिष,
राम मारुती रोड, ठाणे - ४०० ६०२.

दि. २० एप्रिल २००४

संपादक, दिशा
सस्नेह नमस्कार,

डॉ. बा.ना. बेडेकर यांच्या दुःखद निधनाने शिक्षण क्षेत्रातील थोर व्यक्तिमत्व हरपले आहे. खराखुरा शिक्षणमहर्षी काळाच्या पडद्याआड गेला आहे. डॉ. बेडेकर यांनी स्थापन केलेल्या विद्या प्रसारक मंडळाच्या छोट्याशा रोपट्याचे आज वटवृक्षात रुपांतर झाल्याचे दिसत आहे. डॉ. बेडेकर यांनी दूरदृष्टीने स्थापन केलेल्या या आपल्या संस्थेने पूर्वप्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक आणि महाविद्यालयीन शिक्षणापर्यंत अनेक शिक्षणाच्या सुविधा विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करून देऊन ठाण्यातील हजारो विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाच्या विविध क्षेत्रांतील संधी उपलब्ध करून दिल्या आहेत.

डॉ. बा.ना. बेडेकर यांच्या पवित्र स्मृतीस आमच्या सोनोपंत दांडेकर शिक्षण मंडळी या शिक्षण संस्थेच्यावतीने मी त्यांच्या आत्म्यास सद्गती लाभो, अशी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो.

आपला विश्वासू,

**अशोक रा. ठाकूर**
सचिव,
सोनोपंत दांडेकर शिक्षण मंडळी,
पालघर, जि. ठाणे.

# सूची - काही दुर्मिळ ग्रंथांची (पूर्वार्ध)

*ठाण्यातील प्राच्यविद्या संस्थेच्या ग्रंथालयातील १९ व्या शतकातील काही दुर्मिळ पुस्तकांची ही सूची अभ्यासकांसाठी देत आहोत. या संदर्भात अधिक माहिती लागल्यास या संस्थेच्या २५३८८३५८ या दूरध्वनी क्रमांकावर श्री. विश्वनाथ शेंड्ये यांच्याशी संपर्क साधावा.* - संपादक

**भूमिका -**

प्रस्तुत सूची ही ठाण्याच्या प्राच्यविद्या संस्थेतील १९व्या शतकातील दुर्मिळ ग्रंथांची सूची आहे. या दुर्मिळ पुस्तकांमध्ये वेगवेगळे विषय आलेले आहेत. यात पुराणापासून विज्ञानापर्यंत, इतिहास, प्रदेशवर्णन, संस्कृत काव्य, नाटक, मराठी काव्य, रुढी, परंपरा अशा अनेक प्रकारचे विषय यात आहेत. त्या काळातील पुस्तके, पत्रे, वेगवेगळे विषय, लोकांच्या विचार करण्याच्या पध्दती इ. गोष्टी या पुस्तकांच्या सूचीवरुन कळतात. त्या काळातील छपाईचे तंत्रज्ञान कसे होते हे पण कळते. शिवाय या सूचीत संपादक, अनुवादक असेल तर त्यांचे नाव, कोणत्या छापखान्यात पुस्तक छापले आहे याची माहिती, कोणत्या वर्षी छापले आहे, या सर्व गोष्टींची माहिती होते.

याबरोबरच सूचीत लिहिलेला सारांशसुध्दा तितकाच महत्वपूर्ण आहे, कारण एखाद्या पुस्तकाच्या नावावरुन ते कोणते पुस्तक आहे, ते कोणत्या विषयाशी संबधित आहे ते समजत नाही व त्यामुळे एखादा संशोधक किंवा वाचक मोठ्या प्रयत्नाने एखादे पुस्तक मिळवेल व त्याला हवे ते जर ते पुस्तक नसेल तर त्याचा वेळ व मेहनत दोन्ही गोष्टी वाया जातील. म्हणूनच सारांश सुचीमध्ये दिल्यामुळे कुठल्या विषयावर कुठले पुस्तक आहे हे लगेच कळेल व संशोधकाचा वेळ व मेहनत वाचेल.

सदर सूची ही विद्यार्थ्यांपासून शिक्षकांपर्यंत, सामान्य वाचकापासून संशोधकापर्यंत सर्वच स्तरावरील वाचकांना फायद्याची आहे.

संशोधन करता यावे यासारखे विषय यात आहेतच; परंतु मनोरंजन करण्यासारखी पुस्तके पण यात आहेत.

प्राच्यविद्या अभ्यास संस्थेतील सर्व दुर्मिळ पुस्तकांची मुख्य सूची ही पुस्तकांच्या नावाप्रमाणे केलेली आहे.

❑ इंग्रजी पुस्तके जेवढी आहेत ती Alphabetical पण सर्व मराठी पुस्तकांनंतर शेवटी घेतलेली आहेत.

**मुख्य नोंदीची रचना पुढीलप्रमाणे:**

प्रथम पुस्तकाचे नाव, नोंद क्रमांक, नंतर लेखकाचे नाव, संपादक, अनुवादक असतील तर त्यांची नावे, मग संस्थेतील दाखल अंक. प्रकाशनासंबंधी माहिती. यामध्ये छापखान्याचे नाव, ठिकाण व वर्ष याबद्दल माहिती.

नंतर आवृत्ती, किंमत दिली असेल तर. जर आवृत्ती प्रथम असेल तर ती इथे लिहिलेली नाही. प्रथम सोडून इतर आवृत्या दिलेल्या आहेत.

सर्वात शेवटी सारांश. पुस्तकाचा मुख्य विषय कोणता आहे , ते पुस्तक कशावर आधारित आहे याची माहिती यात येते.

१) **ऐतरेय ब्राम्हणम्** - लेखक: आगाशे, काशीनाथशास्त्री (Acc. No. :६९३)

प्रकाशनासंबंधी माहिती: आनन्दाश्रम मुद्रणालय, पुणे. १८९६ किंमत: १०रु.

सारांश: हा १ ते ४ या खंडात आहे. २०अध्याय आहेत. ऐतरेय ब्राम्हण हा ऋग्वेदामधील एक भाग

आहे. वेदलक्षण, वेदावरचे प्रश्न, वेदाधिकार इ. गोष्टी यात आहेत.

२) **ऐतरेय ब्राम्हणम्** - लेखक : आगाशे, काशीनाथशास्त्री (Acc. No. : ७१८)

प्रकाशनासंबंधी माहिती : आनन्दाश्रम मुद्रणालय, पुणे.१८९६ किंमत:१०रु.

सारांश :हा ५ ते ८ या खंडात आहे.यात २१ ते ४० अध्याय आहेत.यामध्ये ब्राह्मण पौरोहित्य, अभिषेक इ. माहिती दिलेली आहे. हा पण वेदाचाच एक स्वतंत्र भाग आहे.

३) **कादम्बरीसार** : लेखक :आपटे, महादेव शिवराम (Acc. No.:१५२३८)

प्रकाशनासंबंधी माहिती : आर्यभूषण प्रेस, पुणे १८९१

आवृत्ती: दुसरी

सारांश : बाणभट्टच्या कादंबरीचे सार यात दिलेले आहे.

४) **पदसंग्रह** - संपादक :ओक, वामन दाजी (Acc. No. ९७८)

प्रकाशना संबंधी माहिती : निर्णयसागर प्रेस, मुंबई १८९६ किंमत: १२ आणे

सारांश: यात अनेक कवींनी रचलेली पदे, कटाव, लावण्या वगैरेंचा संग्रह आहे. एकंदर पदसंख्या ३२६ आहे.

५) **जावजी दादाजी चौधरी यांचे चरित्र**

लेखक : ओक, विनायक कोंडदेव (Acc. No.: ९०९)

प्रकाशनासंबंधी माहिती: निर्णयसागर छापखाना, मुंबई.(१८९२)

सारांश :ज्या छापखान्यात अनेक मोठीमोठी पुस्तके छापली, त्या छापखान्याचे मालक जावजी चौधरी यांचे आत्मचरित्र आहे.

६) **प्रणयि माधव** - संपादक:इस्लामपूरकर, वामन शास्त्री (Acc. No.: ६१०)

प्रकाशनासंबंधी माहिती: दि जॉइंट-स्टॉक प्रेस, मुंबई १८८९

सारांश :ही एक मनोरंजनात्मक प्रेमकथा आहे. त्या काळातील स्त्रियांची स्थिती कशी होती, हे या कथेत सांगितलेले आहे.

७) **सुधन्वावध** - लेखक: कानिटकर,भास्कर विनायक (Acc. No.:९५१)

प्रकाशनासंबंधी माहिती :निर्णयसागर छापखाना, मुंबई.१८९१ किंमत : ४ आणे

सारांश :ही एक सुधन्वा नावाच्या कृष्णाच्या भक्ताची कथा आहे. ईश्वराचे चिंतन एकनिष्ठपणे करावे, हा संदेश या कथेमार्फत दिलेला आहे.

८) **मेघदूतम्** - लेखक:कालिदास /संपादक:परब, काशिनाथ पांडुरंग (Acc. No.:१३५६)

प्रकाशनासंबंधी माहिती:निर्णयसागर छापखाना, मुंबई.१८८३ आवृत्ती : दुसरी

सारांश :कालिदासाच्या संस्कृत काव्याचे भाषांतर आहे. यात मल्लिनाथ यांनी आपले मत, टीका लिहून ठेवले आहे.

९) **रघुवंश लेखक कालिदास** / अनुवादक लेले, गणेशशास्त्री (Acc. No.:१५२४४)

प्रकाशनासंबंधी माहिती : निर्णयसागर छापखाना, मुंबई.१८८३ किंमत : २ रुपये

सारांश: कालिदासाच्या संस्कृत काव्याचे मराठीत भाषांतर आहे. यात दिलीप राजापासून अग्निवर्ण राजापर्यंत सुमारे २८ राजांचे वर्णन यात आहे.

१०) **शाकुन्तलम्** - लेखक कालिदास/संपादक पाटणकर,

पी.एन.(Acc. No.:१५२८९)

प्रकाशनासंबंधी माहिती:आर्यविजय प्रेस, पुणे.१८८९ किंमत : २ रुपये

सारांश: कालिदास लिखित संस्कृत नाटकाचे इंग्रजीमध्ये भाषांतर केलेले आहे.

११) **संगीत-शाकुंतल** - लेखक कालिदास/ संपादक किर्लोस्कर , अण्णा(Acc. No.:९३८)

प्रकाशनासंबंधी माहिती :आर्यभूषण छापखाना, पुणे. १८८१ किंमत: १ रु.४आणे

सारांश:हे एक संगीत नाटक आहे.

१२) **अभिज्ञान शाकुन्तलम्** - लेखक कालिदास / संपादक शर्मा, जगन्मोहन (Acc. No.:१५३०४)

प्रकाशनासंबंधी माहिती: वेणीमाधव चक्रवर्ती मुद्रणालय, कलकत्ता १८७९

सारांश: शाकुंतल नाटक संस्कृतमध्ये आहे.यात वेगवेगळ्या टीपा दिलेल्या आहेत.

१३) **मराठ्यांची बखर** - लेखक केपीन, कप्तान (Acc. No.:१४२९)

प्रकाशनासंबंधी माहिती: मुंबई.१८८९

सारांश: यात मराठ्यांची बखर दिलेली आहे. बखरीचे संपूर्ण वर्णन यात आहे.

१४) **हकिकतवाके** - लेखक गिरीधर (Acc. No.:९२५)

प्रकाशनासंबंधी माहिती: श्री आत्माराम छापखाना, धुळे.१८४५ आवृत्ती : दुसरी. किंमत :१० आणे

सारांश: दासबोधावरील ५ प्रकरणांपैकी हे एक प्रकरण आहे. वाक म्हणजे घडलेल्या गोष्टी सांगणे. गिरीधर यांनी आपण पाहिलेल्या गोष्टी रामदास स्वामींना पत्र रूपाने सांगितलेल्या आहेत.

१५) **आर्यासप्तशती** - लेखक गोवर्धनाचार्य (Acc. No.: १५२७८)

प्रकाशनासंबंधी माहिती :निर्णय -सागर छापखाना, मुंबई.१८८६ किंमत : दीड रुपया

सारांश: एक संस्कृत काव्यमाला आहे.

१६) **अथवृध्द्चाणाख्य** - लेखक चाणाख्य /संशोधक जोशी, लक्ष्मण बापू (Acc. No.:१६९४)

प्रकाशनासंबंधी माहिती: हरी लिंगू कदम यांचा छापखाना, मुंबई १८७०

सारांश: राजनीतीमध्ये ज्या युक्त्या वापरल्या जातात त्या येथे सांगितलेल्या आहेत. राजनीतीवरचे एक पुस्तक.

१७) **निबंधमाला** - लेखक चिपळूणकर , विष्णू कृष्णशास्त्री (Acc. No.: ८७३)

प्रकाशनासंबंधी माहिती : पुणे १८८९

सारांश : यात विष्णूशास्त्री चिपळूणकर यांचे लेख व त्याचबरोबर त्या लेखांवर पत्ररूपाने झालेली टीका दिली आहे. नाटकाचे परीक्षण, चरित्रे व वेगवेगळ्या विषयांवर सखोल माहिती दिली आहे.

१८) **पदार्थ विज्ञान शास्त्र** - लेखक छत्रे, केरो लक्ष्मण (Acc. No.: २४६)

प्रकाशनासंबंधी माहिती : नरोरामचंद्र ठकार छापखाना, पुणे.१८५७ आवृत्ती : दुसरी

सारांश: या पुस्तकामध्ये प्रवाहशास्त्र, वायू, उष्णता, वातावरण, ग्रहमालावर्णन, इ.शास्त्रांमधील माहिती या पुस्तकात आहे.

१९) **गंगालहरी** - लेखक जगन्नाथ संपादक चितळे, श्रीराम नारायण (Acc. No.: ४९९)

प्रकाशनासंबंधी माहिती :फयामिली प्रिंटिंग प्रेस, मुंबई.१८८५ किंमत: ६आणे

सारांश:कवीने हे काव्य गंगास्तवनपर रचले. यात

गंगेची स्तुती आहे. त्यांच्या प्रत्येक श्लोकाबरोबर गंगेचे पाणी वर चढले, असे म्हणतात.

२०) **महिम्नस्तोत्र** - लेखक जगन्नाथ / संपादक चितळे, श्रीराम नारायण (Acc. No.: ४९१)

प्रकाशनासंबंधी माहिती :फॅमिली प्रिंटिंग प्रेस, मुंबई.१८८६ किंमत:६आणे

सारांश: यात महिम्नस्तोत्र देऊन त्याचा अर्थ मराठीत सांगितलेला आहे.

२१) **प्रसन्नराघवम्** - लेखक जयदेव /संपादक परब, काशिनाथ पांडुरंग (Acc. No.:१५२८३)

प्रकाशनासंबंधी माहिती : निर्णय -सागर छापखाना, मुंबई.१८९३ किंमत : बारा आणे

सारांश :रामायणावर आधारित काव्यरूपाने संस्कृत नाटक आहे.

२२) **पदयसमुच्चय** - लेखक जोशी, रामचंद्र भिकाजी (Acc. No.:४३१)

प्रकाशनासंबंधी माहिती : इंदिरा छापखाना, पुणे.१८९६ आवृत्ती: चौथी किंमत :६आणे

सारांश: या पुस्तकामध्ये वेगवगळी पदे, मराठी कविता, टीका,आहेत. त्याचप्रमाणे यात मोरोपंतांची केकावली पण आहे.

२३) **नारायणराव त्र्यंबक ऊर्फ बापूसाहेब मेहेंदळे यांचे चरित्र** - लेखक टिळक,गोविंद कृष्ण

(Acc. No.: २९३)

प्रकाशनासंबंधी माहिती : अंबाप्रसाद छापखाना, पुणे.१८६७ किंमत:१ आणे.

सारांश: बापूसाहेब हे फार मोठे वैद्य होते. अनेक रोग्यांवर त्यांनी औषधोपचार केले होते. त्यांचे चरित्र आहे.

२४) **दशकुमारचरितम्** - लेखक दंडिकवि /संपादक गोडबोले, नारायण बालकृष्ण परब, काशिनाथ पांडुरंग (Acc. No.:१८२०)

प्रकाशनासंबंधी माहिती: निर्णयसागर छापखाना, मुंबई.१८९८ किंमत : दीड रुपया आवृत्ती : तिसरी

सारांश: दंडकवि यांनी लिहिलेले दशचरितम् हे काव्य अर्थासह यात दिलेले आहे.

२५) **वैयाकरणसिध्दान्तकौमुदी** - लेखक दीक्षित, भट्टोजी (Acc. No.:१५३४६)

प्रकाशनासंबंधी माहिती: श्री व्यंकटेश्वर मुद्रणालय, मुंबई.१८९६

सारांश:हे संस्कृत व्याकरणाबद्दल सर्व माहिती सांगणारे पुस्तक आहे.

२६) **पतंजलिचरितम्** - लेखक दीक्षित, रामभद्र/ संपादक पंडित शिवदत्त परब, काशिनाथ पांडुरंग (Acc. No.: ५३२)

प्रकाशनासंबंधी माहिती :निर्णयसागर प्रेस, मुंबई १८९५. किंमत :१०आणे.

सारांश :रामभद्र दीक्षित यांनी पतंजलीचे संस्कृतमध्ये सर्गरूपाने चरित्र लिहिले आहे. ही एक काव्यमाला आहे.

२७) **काव्यमाला** - संपादक दुर्गाप्रसाद शर्मा,काशिनाथ (Acc. No.: ४८७)

प्रकाशनासंबंधी माहिती: निर्णयसागर प्रेस,मुंबई १८८६.

सारांश :या पुस्तकात वेगवेगळी संस्कृत काव्ये एकत्र करून ते प्रसिध्द केले आहे. याचे दोन भाग आहेत.

२८) **गुजरात देशाचा इतिहास** - लेखक देशमुख, गोपाळ हरी (Acc. No.:१३२३)

प्रकाशनासंबंधी माहिती : निर्णयसागर छापखाना,

मुंबई १८९४. आवृत्ती :दुसरी किंमत: दिड रुपया

सारांश : संपूर्ण गुजरातची प्राकृतिक रचना व त्याचा इतिहास यात दिलेला आहे.

२९) **स्त्री-पुरुषांकरिता लोकप्रिय संगीत नवरस गायनसंग्रह** - लेखक धामणस्कर,तुकाराम गणपत (Acc. No.:६९.)

प्रकाशनासंबंधी माहिती :सिविल मिलिटरी आर्फनेज प्रेस. मुंबई १८९१ किंमत: १रु.

सारांश : यामध्ये वेगवेगळी पदे,दुवन्या, गजल,ख्याल,धृपदे, तराणे, टप्पे, दोहरे, दिंड्या, अंजनी, होरी, वेणी, साक्या, लावण्या त्याप्रमाणे गुलबकावली, हामान व जगप्रसिध्द संगीत पुस्तकातील जुन्या व सुरस पद्यांचा शोध करून त्यांचा समावेश केला आहे.

३०) **भट्टवंश काव्य** - लेखक पटवर्धन, गणपतराव हरिहर (Acc. No.:१५२७२)

प्रकाशनासंबंधी माहिती : भाऊनाना छापखाना, कुरुंदवाड.१८९३

सारांश : भट हे श्रीमंत पंत पेशवे यांच्या दरबारात भट झाले होते.त्यांच्या वंशांनी जे पराक्रम केले त्याचे वर्णन यात आहे.

३१) **श्री वज्रेश्वरी चरित्र** - लेखक पारख, बळवंत खंडूजी (Acc. No.: ३१६)

प्रकाशनासंबंधी माहिती : निर्णयसागर छापखाना, मुंबई. १८९८

सारांश :वज्रेश्वरी देवी व देवीचे मंदिर, इतर सीमा, ठिकाणं, इ. ऐतिहासिक गोष्टींची माहिती यात दिलेली आहे.

३२) **श्रीपंचदशी** -संपादक पितांबर (Acc. No.: ९५२)

प्रकाशनासंबंधी माहिती: निर्णयसागर प्रेस, मुंबई १८९४ आवृत्ती : दुसरी

सारांश यात वेदाबद्दल त्याचप्रमाणे पंचमहाभूतांबद्दल सखोल माहिती श्लोकातून दिलेली आहे.

३३) **ब्दीसंधान** -लेखक बदरीनाथ (Acc. No.: १५२७५)

प्रकाशनासंबंधी माहिती: निर्णयसागर छापखाना, मुंबई.१८९५. किंमत : दीड रुपया

सारांश : महाभारत (हस्तिनापूर) व रामायण (अयोध्या) याविषयीची माहिती देणारे काव्य आहे.

३४) **कर्णसुंदरी** -लेखक बिहहलना /संपादक परब, काशिनाथ पांडुरंग, दुर्गाप्रसाद (Acc. No.:१५३४२)

प्रकाशनासंबंधी माहिती : निर्णयसागर छापखाना, मुंबई. १८८८ किंमत : आठ आणे

सारांश :हे एक काव्यात्मक संस्कृत नाटक आहे.

३५) **वेणीसंहार** - लेखक भट्ट, नारायण (Acc. No.: १२९०)

प्रकाशनासंबंधी माहिती : १८९६

सारांश : महाभारतावर आधारित एक संस्कृत नाटक आहे.

३६) **विव्दन्मोदतरंगिणीकाव्यम्** - लेखक भट्टाचार्य (Acc. No.: ७१३)

प्रकाशनासंबंधी माहिती : श्री व्यंकटेश्वर मुद्रणालय, मुंबई.१८९८

सारांश : भट्टाचार्य यांनी लिहिलेले हे एक संस्कृत काव्य आहे.

३७) **विव्दन्मोदत्तरङि्.गणीकाव्यम्** - लेखक भट्टाचार्य, चिरंजीव (Acc. No.:१५६७)

प्रकाशनासंबंधी माहिती : श्री व्यंकटेश्वर मुद्रणालय, मुंबई.१८९८

सारांश :देवांबद्दल माहिती सांगणारे एक संस्कृत काव्य आहे.

३८) **हास्यार्णवप्रहसनम** - लेखक भट्टाचार्य, जगदीश्वर (Acc. No.:१५३१५ )

प्रकाशनासंबंधी माहिती : कलकत्ता यंत्रणालय, कलकत्ता १८९६ आवृत्ती : दुसरी

सारांश : हे एक संस्कृत विडंबनात्मक नाटक आहे.

३९) **गोपाथब्राम्हणम्** - संपादक भट्टाचार्य, जीवानन्द विद्यासागर (Acc. No.: १६७१)

प्रकाशनासंबंधी माहिती : नारायण मुद्रणालय, कलकत्ता. १८९१

सारांश :यामध्ये गोपथब्राह्मणाबद्दल माहिती दिलेली आहे. ती यात सांगितलेली आहे.

४०)**दख्खनचा प्राचीन इतिहास** - लेखक भांडारकर, रा.गो.भाषांतरकार बापट,नारायण विष्णू

(Acc. No.:१२९९)

प्रकाशनासंबंधी माहिती : निर्णयसागर छापखाना, मुंबई. १८८७ आवृत्ती : दुसरी किंमत: १२ आणे

सारांश: मुसलमानांच्या विजयापर्यंत संपूर्ण दख्खनचा इतिहास यात आहे

४१) **सार्वजनिक आरोग्य** - लेखक भाटवडेकर, भालचंद्र कृष्ण (Acc. No.: १५६२)

प्रकाशनासंबंधी माहिती : निर्णय-सागर छापखाना, मुंबई. १८७९ किंमत : १२ आणे

सारांश : आरोग्यरक्षणाची मूलतत्वे दिली आहेत. खेडेगावातील आरोग्य कसे असावे, भोजन कुठले घ्यावे या बद्दल माहिती यात आहे.

४२) **किरातार्जुनीयम्** - लेखक भारवी संपादक परब, काशीनाथ, पांडुरंग दुर्गाप्रसाद (Acc. No.:१५३०३)

प्रकाशनासंबंधी माहिती : निर्णयसागर छापखाना, मुंबई.१८९५ किंमत : २ रुपये आवृत्ती : तिसरी

सारांश : महाभारतातील अर्जुनावर काव्यरुपाने माहिती दिलेली आहे.

४३) **नाट्यकवितासंग्रह** - लेखक भावे, विष्णू अमृत (Acc. No.: ६७१)

प्रकाशनासंबंधी माहिती: श्री.शिवाजी छापखाना, पुणे १८८५

सारांश : या पुस्तकात कविता, मंगलाचरण, नाटकारंभी म्हणावयाचे अभंग, शंकर, गणपती आगमनाची पदे,राग, ताल, इ. गोष्टी आहेत.

४४) **तर्क कौमुदी** -लेखक भास्कर, लौगाक्षी संपादक परब, काशिनाथ पाडुरंग (Acc. No.: ८७०)

प्रकाशनासंबंधी माहिती: निर्णयसागर प्रेस, मुंबई.१८९७ किंमत २ आणे.

सारांश : संस्कृत भाषेवर भाष्य करणारे, भाषेसंबंधी खोलवर माहिती सांगणारे पुस्तक.

४५) **पंचदशी** - लेखक मद्वीदयारण्यमुनी (Acc. No.: १२७८)

प्रकाशनासंबंधी माहिती:जगध्दितेच्छु छापखाना, पुणे.१८९५ किंमत: ३आणे

४६) **उदद्योगपर्व** - लेखक मयूरकवि (Acc. No.: १५५६०)

प्रकाशनासंबंधी माहिती: श्री हरिवरदा छापखाना, मुंबई.१८९१

सारांश :यात माहाभारतातील माहिती सांगितलेली आहे. भीष्मपर्व व द्रोणपर्व असे दोन भाग आहेत.

(पान क्र. २२ वर)

# रमंथ

*'रमंथ' हा काव्यसंग्रह तसा जुनाच. पण द्वितीय वर्ष विज्ञान शाखेतील विद्यार्थी तो वाचतो तेव्हा त्याला काय वाटते ते - संपादक*

कपाट रचताना अचानक मला भेट मिळालेलं पुस्तक हाती लागलं. पुस्तक चाळता - चाळता त्यातील कवितांनी माझ्यावर घट्ट पकड निर्माण केली आणि तेव्हाच या पुस्तकाचा परिचय लिहायचा असं मनोमन ठरवलं. डॉ. र. म. शेजवलकर हे साहित्यिकांत काही नवे नाहीत. त्यांच्या आजवर ११ कादंबऱ्या प्रसिद्ध झाल्या आहेत. तसेच अनेक स्पर्धांतून त्यांच्या एकांकिका व नाटकेही गाजलीत. व्यवसायाने डेंटल सर्जन असलेल्या डॉ. शेजवलकर यांचा काव्यसंग्रह भरीव आणि वाचकांच्या मनात ठसा उमटविणारा वाटला. 'रमंथ' हा मौज प्रकाशनाने प्रकाशित केलेला काव्यसंग्रह १९८९ साली प्रसिद्ध झाला. ७६ कविता असलेल्या या काव्यसंग्रहातून मानवीय जीवनाचे, भावभावनांचे, संवेदनांचे अचूक चित्रण निसर्गाच्या साहाय्याने केलेले आहे.

मानव हा या पृथ्वीवरील सर्वांत बुद्धिमान प्राणी. पण याच संभ्रमात माणूस स्वतःला सर्वश्रेष्ठ समजतो आणि आपल्या आजूबाजूला असलेल्या गोष्टींना गौण स्थान देतो. खरं पाहिलं तर निसर्गाच्या तुलनेत मानवाचं अस्तित्व खूपच लहान आहे. असा आशय व्यक्त करणारी 'आपल्याच मोजमापात' हे कविता (पृ. क्र. ७) खूपच सशक्त वाटते.

*आपल्याच मोजमापात*
*सर्व गोष्टी बसवायच्या म्हटले,*
*की माणसांना नकाशात दाखवायचे तरी कसे ?*

एकत्र कुटुंबपद्धती ही आता फक्त चित्रपटातून अथवा मालिकांतून पहायला मिळते. दोन भावंडांतील भांडण आणि त्यामुळे दुभंगणारे घर याचे चित्रण कवी 'झगडा' (पृ. क्र. १३) या कवितेतून करतात तेव्हा कुटुंबव्यवस्थेत सुरू असलेल्या अधःपतनाचा प्रत्यय येतो.

*एकाच कुटुंबात राहणाऱ्या*
*माकडाचा आणि तत्त्वचिंतकाचा झगडा*
*डोहात सूर मारावा*
*तर मोकळ्या आभाळाचा ठाव सुटतो;*
*आणि नव्या नव्या झाडांच्या*
*उंच फांद्या गाठाव्यात*
*तर मुळांचा पत्ताच बेपत्ता होतो.*
*आडवी भिंत घालून द्यावी*
*तर दाराच्या पाटीवर नाव कुणाचे लिहायचे ?*
*आणि दोन स्वतंत्र बिऱ्हाडे थाटावीत*
*तर घराचे घरपण कशात शोधायचे ?*

प्रत्येक माणसाच्या वाट्याला कोणत्या ना कोणत्या प्रकारचं आयुष्य हे येतच असतं. पण आयुष्याला हरून न जाता लढत राहणं आणि निराशेबरोबर मात करून जगणं असा आशय व्यक्त करणारी 'सर्व्हे' (पृ. क्र. १८) ही कविता व्यक्त करण्याच्या पद्धतीतील वेगळेपणामुळे अधिक उठून दिसते. तसेच काम कोणत्याही प्रकारचे असो, ते चिकाटीने करायला हवे, असाही विचार कदाचित कवीला येथून द्यायचा आहे.

''देवाची मर्जी....' मुख्याध्यापक डोळ्यांवरचा गॉगल काढून हसऱ्या खाचांनी, आपल्या अंध विद्यालयाच्या पाटीकडे बोट दाखवितात.

मी शरमेनं अर्धमेला होऊन जायला निघतो तेव्हा ते जिन्यापर्यंत सोडायला येत म्हणतात,

*''सांभाळून उतरा -*
*जिन्याची तळातली पायरी जरा डगडगत्येय ...''*

'अलीकडे' ही कविता (पृ. क्र. ४२) वयोमानाने येणाऱ्या समजूतदारपणावर आधारलेली आहे. अनेक ऊन-पावसाळ्याचा अनुभव आल्यावर प्रत्येकाला आपापला हिशोब जमू लागतो, हे कवीने अत्यंत कमी शब्दांत यथार्थ टिपले आहे.

*डोळ्यांची पंचांगे*
*दिवसेंदिवस समजूतदार होत चाललीयत,*
*माझ्या प्रत्येक दिवसाचे*
*फलज्योतिष सांगताना -*
*अलीकडे त्यांना अचूक कळू लागलेत*
*वळवाचे अनपेक्षित मोसम*
*आणि जळजळीत निखाऱ्यांचे तिथीनक्षत्र*

'पर्याय' या कवितेतून (पृ. क्र. ४८) वृद्धत्वाकडे प्रवास सुरू असणाऱ्या बैलाचे चित्रण केलेले आहे. वयोमानाने बैलात पर्यायाने वृत्तीत येणारे बदल कवीने येथे अचूक टिपलेले आहेत.

*अमर्याद शक्तीने*
*बेगुमान फुसांडणाऱ्या या मस्तवाल बैलाला*
*अलीकडे झालंय तरी काय ?*
*कोलदांडा घालण्याआधीच,*
*आपले चारही पाय निमूटपणे पुढे करतोय*
*नालबंद करताना,*

काव्यसंग्रहातील 'तात्पर्य' ही कविता (पृ. क्र. ५२) त्यातील वेगळ्या मांडणीमुळे विशेष वाटते. पंचतंत्रातल्या एका गोष्टीवर आधारलेल्या या कवितेतून कवी एकजुटीचे महत्त्व सांगतो असे वरुन पाहिल्यावर दिसते, पण कितीही एकजूट असली तरी आपापसांतील संघर्ष कधीच मिटत नाही असा मतितार्थ यात दडलेला आहे.

तात्पर्यः

*एकजुटीने पारध्यापासून सुटका करून घेता येते, जाळ्यापासून नाही.*

'अतिदक्षता कक्षात' (पृ. क्र. ७९) ही कविता त्यातील उत्कृष्ट चित्रणामुळे जिवंत झाल्यासारखी वाटते. जीवन आणि मृत्यू या एकाच तळ्याच्या दोन बाजू आहेत आणि यांना जोडणारा दुवा म्हणजेच अतिदक्षता विभाग. कवितेत वापरल्या गेलेल्या रुपकांमुळे कविता अधिक उठावदार ठरते.

*नाळ तोडण्याच्या आरोपाखाली*
*फाशी गेलेली सलाइनची बाटली*
*वेगळ्याच भेटीगाठींची सुरुवात*
*तीन पाळ्यांतल्या मख्ख परिचारिका*

काव्यसंग्रहातील सर्वांत चांगली व काळजाला भिडणारी कविता म्हणजे 'गोधडी' (पृ. क्र. ८४). आपल्या व्यक्तींच्या वस्तूने तयार झालेल्या गोधडीत कवीच्या असंख्य आठवणी दडलेल्या आहेत.

*हा घासून घासून विटलेला गोल,*
*वर्षातून फक्त एकच नवी विजार वापरणाऱ्या*
*वडिलांच्या व्यावहारिक दक्षतेचा*

*ही जरतारी चौकट ,*
*आईने स्वतःचा वधूवेश*
*स्वतःहून मोडीत काढलेल्या गोष्टीतील*
*दुष्ट राक्षसांपासून बचाव करण्याचा*

*हा अवक्राचा साडीचा अख्खा पदर,*
*तिने झोपताना सांगितलेल्या गोष्टींतील*
*दुष्ट राक्षसांपासून बचाव करण्याचा*

काव्यसंग्रहातील घड्याळ, प्लँचेट, आत्ममग्न आरसे, खळवळ, पॅरोल, अवेळी भूतदयेच्या भीतीने या कविताही आपले वेगळेपण सिद्ध करतात. पण त्या

परिचयात देण्याचा मोह मला आवरावा लागला. कारण पुस्तक परिचय वाचण्यापेक्षा पुस्तक वाचण्यात जास्त मजा असते. कारण ज्याला कविता भेटते ती त्याची होऊन जाते असं म्हणतात. म्हणजेच समोर असलेला वाचक, त्याचा स्वभाव त्या कवितेचा अर्थ ठरवत असतो. 'रमंथ' या काव्यसंग्रहातील बहुतांश कविता या मानवीय कंगोरे उलगडून दाखवतात. या कविता वाचताना कवीचा कवितेकडे पाहण्याचा वैचारिक दृष्टिकोन दिसून येतो. म्हणूनच १५ वर्षांनंतरही या कविता तितक्याच नवीन, आजच्या वाटतात. कविता वाचताना त्यातील प्रत्येक गोष्ट, वस्तू ही डोळ्यासमोर उभी राहते, त्यामुळे कवीच्या चित्रणालाही विशेष दाद द्यावीशी वाटते. जणू काही कवीच्या हातात लेखणी नसून कॅमेराच आहे हा विचार काव्यसंग्रह वाचताना मनात घर करून जातो. उगाच क्लिष्ट शब्दांचा वापर टाळल्यामुळे आणि सहज-सोप्या मांडणीमुळे कवितेशी पटकन गट्टी जमते. काव्यसंग्रहातील आणखी एक चांगली गोष्ट म्हणजे काव्यसंग्रहाला कोण्या बड्या कवीची शिफारशीची प्रस्तावना नाही. किंबहुना त्याची गरजदेखील भासत नाही. कारण या कविताच स्वत:ची ओळख निर्माण करणाऱ्या आहेत. परंतु कवीचे मनोगत आवश्यक वाटते. 'रमंथ' हे शीर्षक रवंथ या प्रक्रियेशी मिळतेजुळते आहे. कवीने या सर्व गोष्टी एकेकाळी मनात साठवलेल्या आहेत आणि या काव्यसंग्रहाच्या रूपाने त्या हळूहळू बाहेर पडल्या आहेत. याचा प्रत्यय 'रमंथ' या शीर्षकाद्वारे नक्कीच आहे.

**गीतेश गजानन शिंदे**
२०३, स्वप्नजा सोसायटी,
धोबी आळी, मावळी मंडळ हॉलजवळ,
टेंभी नाका, ठाणे (प.) ४०० ६०१.
दूरध्वनी : २५३७ ९५१९

●●●

(पान क्र. १९ वरून)

## सूची - काही दुर्मिळ ग्रंथांची

४७) **कर्णपर्व** - लेखक मयूरकवि (Acc. No.: १५५७७)

प्रकाशनासंबंधी माहिती : श्री हरिवरदा छापखाना, मुंबई.१८९१

सारांश :महाभारतातील कर्णाबद्दल यात सर्व माहिती दिलेली आहे.

४८) हरिवंश -लेखक मयूरकवि (Acc. No.: १५५६३)

प्रकाशनासंबंधी माहिती : श्री हरिवरदा छापखाना, मुंबई.१८९१

सारांश :श्रीकृष्णाबद्दल व त्याचबरोबर महाभारताचे वर्णन यात आहे

४९) **कृष्णविजय** - लेखक मयूरपंत संपादक पंडित, शंकर पांडुरंग (Acc. No.: १५५६६)

प्रकाशनासंबंधी माहिती : इंदुप्रकाश प्रेस, गिरगाव. १८६३

सारांश :महाभारताचे वर्णन यात आहे.

५०) शिशुपालवधमदिमं - लेखक माघकवी (Acc. No.: १५२६८)

प्रकाशनासंबंधी माहिती : जगध्दितेच्छु मुद्रणालय, पुणे. १८९०

सारांश :शिशुपाल वधाची माहिती संस्कृतमध्ये दिलेली आहे.

(क्रमश: )

**स्मृती जोशी**
ग्रंथालय व माहितीशास्त्र पदवी वर्ग,
बांदोडकर विज्ञान महाविद्यालय, ठाणे

# भारतीय सोळा स्मारके

*भारतातील प्रसिद्ध अशा कलाकृतींचा परिचय सदर लेखमालेतून करून देत आहोत. - संपादक*

(लेख १ला)


पुरातन स्मारके म्हणजे इतिहासाचे साक्षीदार. पूर्वजांच्या कामगिरीचे दीपस्तंभ. इतिहासाच्या वाटचालीतील हे खास मैलाचे दगड जतन करणे सुसंस्कृतपणाची साक्ष होय. सर्वच देश आपापल्या प्राचीन स्मारकांना काळजीपूर्वक जपतात. पण काही स्मारके केवळ एका देशाचीच नव्हे तर अखिल मानवजातीचा वारसा ठरावी इतकी महत्त्वाची असतात. आधुनिक पद्धतीने त्यांना जसेच्या तसे सांभाळणे ही सर्व राष्ट्रांची सामुदायिक जबाबदारी ठरते. म्हणून युनेस्को ही संस्था त्यात लक्ष घालून काही स्मारकांची जागतिक वारसा म्हणून निवड करते.

युनेस्कोच्या यादीत जी भारतीय स्मारके येतात, त्यात ९ एप्रिल १९९४ रोजी दोन स्मारकांची-कुतुबमिनार व हुमायूनची कबर भर पडल्याचे जाहीर झाले. यापूर्वी चौदा स्मारके यादीत होतीच, ती आता सोळा झाली. अधिकृतरीत्या जगन्मान्यता पावलेली आपली स्मारके कोणती, हे कदाचित पुष्कळांना माहीत नसेल. म्हणून या लेखमालेद्वारे त्यांची ओळख करून घेऊ. सुरुवातीला युनेस्कोच्या यादीतील सोळा स्मारके पाहू.

महाराष्ट्रात १) अजिंठा, २) वेरूळ - कैलासमंदिर, ३) घारापुरी - त्रिमूर्ती, ४) कर्नाटकात - पट्टदकल येथील विरुपाक्ष मंदिर, ५) हंपी येथील विठ्ठल मंदिर व हजाराराम मंदिर, तामिळनाडूत ६) महाबलीपुरम् येथील रथमंदिरे, ७) तंजावरचे बृहदीश्वर (राजराजेश्वर) मंदिर, गोव्यात ८)जुनी चर्चेस, मध्यप्रदेशात ९) सांची येथील स्तूप, १०) खजुराहोचे कंदारिय महादेव मंदिर, ओरिसात ११) कोणार्क येथील सूर्यमंदिर, उत्तर प्रदेशातील १२)फतेहपूर सिक्री, १३) आग्र्याचा किल्ला, १४) ताजमहल, १५) दिल्लीतील कुतुबमिनार, १६) हुमायूनची कबर.

या स्मारकांबरोबर तेथील कलेच्या दृष्टीने महत्त्वाच्या गोष्टींचीही माहिती देण्याचा प्रयत्न राहील. आपण अजिंठ्यापासून सुरुवात करू.

१) **अजिंठा** - महाराष्ट्रातील प्राचीन शैलगृहे व भित्तीचित्रे यांचे एक जगप्रसिद्ध स्थळ. अजिंठा हा गाव लेण्यांजवळ ६ कि.मी.च्या आत डोंगरमाथ्यावर असल्यामुळे इंग्रज लेखकांनी त्यांचा उल्लेख अजिंठ्याची



अजिंठ्याच्या लेण्यांचा अनुविक्षेप (प्लान)

लेणी असा केला असला तरी स्थानिक लोक त्याला 'फर्दापूरची लेणी' असेच म्हणतात. सह्याद्री पर्वताच्या सातमाळ रांगेतील इंध्याद्री शाखेत ही लेणी खोदलेली आहेत. १० व्या लेण्यातील लेखावरून असे स्पष्ट झाले आहे की, १८१९ च्या एप्रिल महिन्यात स्मिथ या अधिकाऱ्याला ही लेणी प्रथम ठाऊक झाली. येथील चित्रशैलीचा प्रभाव नंतरच्या भारतातील व भारताबाहेरील चित्रकलेवरही पडलेला दिसतो. यावरून येथील कला प्रेरणाशील होती व अद्यापही आहे, हे निर्विवाद सत्य आहे.

येथे एकूण ३० बौद्धधर्मीय गुंफा आहेत. त्यातील ९, १०, १९, २६, २९ ही चैत्यगृहे असून बाकीचे पंचवीस विहार आहेत.

इतर शैलगुहांप्रमाणे अजिंठ्याची शैलगृहे त्यातील वास्तुकलेसाठी आणि मूर्तिकलेसाठी प्रसिद्ध असली तरी येथील लेणी मुख्यत्वे चित्रकलेकरिता प्रख्यात आहेत. अजिंठा येथील चित्रकलेत जसे धार्मिक पावित्र्य व धर्मनिरपेक्षता यांचे विलक्षण व अतूट एकीकरण झालेले दिसते, तसे भारतीय चित्रकलेत अन्यत्र कोठेही दिसत नाही. तत्कालिक काव्य व नाट्य या कलांप्रमाणेच चित्रकलादेखील राजेशाही वैभवातून जन्माला आली आहे, तरीही तिला जीवनाच्या अंतिम ध्येयाचा विसर पडलेला नाही. आध्यात्मिकतेने नटली आहे. अजिंठ्याच्या चित्रात प्रारंभीच्या बौद्धकलेतील वास्तववादापासून दूर सरकलेली प्रतिके दिसत नाहीत. येथील कला धार्मिक स्वरूपाची असूनही लालित्यपूर्ण आहे. जीवनाच्या प्रत्येक अंगाला आध्यात्मिक दृष्टीने समान मूल्य आहे.

**अजिंठ्याच्या भित्तीचित्रांचे तंत्र -**

चित्रे काढण्यासाठी भिंतीवर प्रथम माती, शेण, भाताचा भुसा, तूस यांचा बळगाळ मिश्रणाचा गिलावा चढवीत. त्यावर चुन्याचा एक हलका हात मारून त्यावर गेरूने प्रथम चित्रांची बाह्यरेषा रेखाटून त्यात क्रमाने रंग भरीत. अजिंठ्याच्या चित्रकारांनी मुख्यत: पांढरा, काळा, पिवळा, हिरवा, तांबडा आणि निळा हे रंग आपल्या चित्रकलेत वापरले आहेत. त्यापैकी पुष्कळसे रंग नैसर्गिक पदार्थांपासून केलेले आहेत व अशी मूलरंगद्रव्ये अजिंठ्याजवळच सापडतात. लाखेपासून केलेल्या कार्बनी तांबड्या रंगासारखे काही उडणारे रंगही वापरले असावेत. कारण काही चित्रांतील मानवी आकृतींच्या ओठावरील लाल रंग नाहीसा झालेला दिसतो. फक्त निळा रंग तेवढा आयात केलेला असावा. सरसाचा रंगबंधक म्हणून बहुधा वापर केला असावा. भित्तिचित्रांशिवाय मूर्तिकामही रंगवलेले असावे. कारण अशा कामाचे अवशेष तेथे आढळले आहेत.

चित्रप्रसंग बव्हंशी जातकादी ग्रंथांतील बुद्धांच्या कथांतून निवडलेले आहेत. याशिवाय बौद्ध धर्मग्रंथांतून वर्णिलेल्या काही देवता, यक्ष, किन्नर, गंधर्व, अप्सरा आणि निरनिराळे प्राणी यांचीही चित्रे आहेत. छतांवर आणि स्तंभांवर वेलबुट्टीचे अप्रतिम नमुने चितारलेले आढळून येतात. अजिंठ्यातील स्त्रियांच्या चित्राकृती अपूर्व आहेत. काही लेणी अपूर्ण आहेत व काही पडझड झाल्यामुळे खराब झाली आहेत. जी सुस्थितीत आहेत त्यांची वैशिष्ट्ये पाहू.

**गुहा क्र. १** - अजिंठ्यातील सर्वात प्रसिद्ध चित्रे पहिल्या क्रमांकाच्या गुहेत आहेत. त्यांचा काळ उत्तरगुप्तकाळापासून ते प्रारंभीच्या चालुक्य काळापर्यंतचा म्हणजे ५ व्या शतकाच्या उत्तरार्धापासून ७ व्या शतकाच्या सुरुवातीपर्यंतचा आहे.

हे लेणे चतुष्कोनी असून गर्भगृहात बुद्धाची प्रतिमा कोरलेली आहे. ओवरीच्या स्तंभावर अप्रतिम नक्षीकाम आहे. मंडपाच्या तीनही बाजूस भिक्षूंकरिता खोल्या खोदल्या असून मंडपाच्या भिंतींवर चित्रे आहेत. ही चित्रे जातकादी कथांतील असून त्यातील 'पद्मपाणि बोधिसत्त्व'चे चित्र प्राचीन भारतीय चित्रकलेचा उत्कृष्ट नमुना

समजले जाते. बोधिसत्त्वाच्या उजव्या हातात एक निळे कमळ आहे त्यावरून या चित्राला पद्मपाणि बोधिसत्त्व हे नाव प्राप्त झाले आहे. चित्राच्या मध्यवर्ती भागात बोधिसत्त्वाची भव्य आकृती रेखाटलेली आहे. विविध प्रकारच्या आकृतींनी भरगच्च भरलेल्या निसर्गदृश्याच्या पार्श्वभूमीवर ते उठून दिसते. बाजूच्या आकृत्या या त्याची शक्ती, अनुयायी, सेवक, गंधर्व, किन्नर, माकडे यांच्या आहेत. कारुण्यमूर्ती बोधिसत्त्वाबद्दलचा आत्यंतिक भक्तिभाव त्यांच्या चेहऱ्यावर दिसतो. हे चित्र प्रेक्षकाला एकाच दृष्टिक्षेपात संपूर्णपणे पाहता येत नाही. या सर्व आकृतींच्या हालचाली व आविर्भाव यामुळे त्यांची दृष्टी सहजपणे सभोवार फिरून परत बोधिसत्त्वाच्या मुख्य आकृतीकडे वळते. त्यामुळे शेवटी सर्व संयोजनाची एकात्मता जाणवते. आकृत्यांची प्रमाणे त्यांच्या दर्जाला अनुसरून लहान-मोठी आहेत. बोधिसत्त्वाच्या खूप मोठ्या आकारामुळे रचनेच्या दृष्टीने चित्राला एक उभा अक्ष लाभला आहे व इतर सर्व चित्राची जुळणी त्याच्या सभोवार झाली आहे. शरीराच्या त्रिभंगाकृती अवस्थेमुळे (तीन ठिकाणी बाकदार असलेल्या) झुलता डौल व गती निर्माण झाली आहे. झुकलेले मस्तक आणि हाताचा अपूर्व आविर्भाव यामुळे विलक्षण सजीवता व ऐट प्रत्ययास येते. देवत्वाला अनुरूप असणारी सर्व सौंदर्यलक्षणे त्यात उपयोजिली आहेत. अंडाकृती चेहरा, धनुष्याकृती भुवया, पुष्ट खांदे व बाहू, सर्वांत मनोहर म्हणजे फुललेल्या कमळासारखा अत्यंत डौलदार उजवा हात यामुळे त्याची आकृती कमनीय झाली आहे.

विशेष लक्षात घेण्यासारखी गोष्ट म्हणजे, मानवी शरीराच्या उघड्या भागावर छायाप्रकाश दाखवून गोलाईचा भास निर्माण केला आहे. पण हे चित्र नैसर्गिकपणे पडलेल्या प्रकाशाचे वास्तवानुसारी चित्रण नाही. प्रकाश एका बाजूने पडल्यावर त्याच्या विरुद्ध बाजूच्या पातळ्यांवर छाया पडते. या प्रकारचे हे चित्रण दिसत नाही तर केवळ घनता व गोलाई दाखवण्यासाठीच त्याचा उपयोग केला आहे. नाकाच्या दोन्ही बाजूस काल्पनिक छाया दाखवून नाकाचा उठाव निर्माण केला आहे.

या चित्रात शारीरिक व आध्यात्मिक सौंदर्याचा अपूर्व समन्वय घातलेला दिसतो. राजैश्वर्याने नटलेल्या व शारीरिक लयबद्ध सौंदर्ययुक्त असलेल्या बोधिसत्त्वाचे अर्धोन्मिलित डोळे, कमळ धरलेला हात, पुढे निघालेला, परंतु एकदम थबकलेला असा आविर्भाव या सर्वांतून एक प्रकारची आध्यात्मिक उदात्तता प्रत्ययास येते. कारुण्य, दया इ. भाव इथे साकार झालेले दिसतात. दुःखी जीवांचा हा एकमेव आधार आहे व त्यांच्या यातना, दुःख नाहीसे करण्याचे सामर्थ्य त्याच्यात आहे, असा विश्वास वाटतो. त्याचे सौंदर्य वास्तवाच्या पलीकडचे, स्वर्गीय आहे. ज्याने कुणी चित्र रेखाटले आहे त्याचे चित्रकलेच्या परंपरांचे, नृत्य, मूर्तिविज्ञान यांचे ज्ञान, तंत्रकौशल्य व प्रतिभेचा दिव्य आविष्कार पाहून मन थक्क होते.

क्र. १ च्या लेण्यातील गर्भगृहातील बुद्धाचे एक शिल्प वैशिष्ट्यपूर्ण असून त्यात बुद्धाचे स्मित, विषाद आणि ध्यान असे तीन स्पष्ट भाव विभिन्न कोनातून पाहिले असता दिसतात. याशिवाय लेण्याच्या मागील बाजूस असणाऱ्या पडवीच्या स्तंभावर एक मुख व चार धडे असणाऱ्या हरणाचे चमत्कृतिपूर्ण असे शिल्प आहे.

क्र. २ च्या लेण्याची रचना क्र. १ सारखीच आहे. परंतु याच्या अंतराळाच्या दोन्ही बाजूस लहान मंदिरे आहेत. त्यातील एकात बुद्धाची भव्य मूर्ती आणि दुसऱ्यात दोन यक्षांच्या भव्य मूर्ती आहेत. बुद्धाची मूर्ती असलेल्या गर्भगृहाच्या प्रवेशद्वाराच्या डाव्या भिंतीवर बुद्धाच्या शेकडो प्रतिमा असून शेजारच्या स्तंभांची स्तंभशीर्षे कमळाकृती आहेत.

क्र. ४ हा विहार सर्व विहारात मोठा आहे. त्याला २८ खांब आहेत. व्हरांड्याला आठ अष्टकोनी स्तंभ असून

सर्वांवर कोरीव काम केलेले आहे. मधले दार नक्षीयुक्त असून चौकटीवर अनेक आकृत्या आहेत. त्याच्याजवळचे बुद्धाच्या शांतिपाठाचे कोरीव काम लक्षवेधक आहे.

क्र. ६ चे एकच दोन मजली लेणे आहे. वरच्या मजल्यावरील द्वारावरील चित्रे प्रेक्षणीय असून येथील काही खांब नादवाही आहेत.

क्र. ९ हा चैत्य इ.स.पू. १ ल्या शतकातील आहे. मंडपाची मागील बाजू अर्धवर्तुळाकृती असून त्या भागात स्तूप कोरला आहे. चैत्याच्या दर्शनी भागाच्या दोन्ही बाजूस भिंतीवर वरदहस्त मुद्रायुक्त बुद्धाच्या उभ्या दोन मूर्ती आहेत. चैत्यगृहास एकूण २१ दगडी स्तंभ असून ते अष्टकोनी व अनलंकृत आहेत.

स्थापत्य शिल्प आणि चित्रकला यांचे उत्कृष्ट नमुने क्र. १६ या लेण्यात पहावयास मिळतात. या लेण्यात बुद्धाची प्रलंबपाद आसनातील भव्य मूर्ती असून तेथील चित्रातील ग्लानी येऊन मूर्च्छित झालेल्या सुंदरीचे चित्र अप्रतिम आहे. या चित्रातील देवदत्ताची पत्नी मूर्च्छित अवस्थेत आहे. तिच्या दासी तिला शुद्धीवर आणण्याची खटपट करीत आहेत. त्या तिला पंख्याने वारा घालीत आहेत. समोर एका मनुष्याच्या हातात मुकूट आहे. तो भगवान बुद्धाचा चुलतभाऊ देवदत्त याचा आहे. बुद्धाने देवदत्तास दीक्षा दिली असल्याची जाणीव होताच राजपत्नीला मूर्च्छा येते. चित्रात राजपत्नीच्या आसपास उभे असलेले सर्व नोकर तिला सावध करण्याचा प्रयत्न करत आहेत. त्या सर्वांच्या मुखावरील चिंता व व्याकुळता आणि राजपत्नीची मूर्च्छित अवस्था हे भाव कलाकाराने बहारदारपणे रेखाटले आहेत.

मनुष्याकृतीचे जोरदार रेखांमध्ये झालेले आलेखन हे अजिंठ्याच्या कलेचे वैशिष्ट्य आहे. भारतीय कलेत रेषेला अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. अजिंठ्याच्या कलावंताने रेषांवर चांगलेच प्रभुत्व मिळवले होते. याची जाणीव वरील चित्रातून होते. याखेरीज मनुष्यदेहाचा सूक्ष्म अभ्यास व विशेषत: बोटांची लययुक्त रचना हे विशेषही चित्तवेधक आहेत.

गुहा क्र. १७ च्या द्वारमंडपात रेखाटलेल्या चित्रांचे अवशेषही फार महत्त्वाचे आहेत. त्यावरील लेखावरून ते ५व्या शतकाच्या उत्तरार्धातील असल्याचे दिसते. त्यातील एक चित्र स्वर्गाला भेट देण्यासाठी आलेल्या बुद्धाच्या स्वागतासाठी गंधर्वादिकांच्या परिवारासह आकाशातून निघालेल्या इंद्राचे आहे. वाकलेले पाय, गळ्यातील दागिन्यांना गतीमुळे मिळालेला झोक आकृत्यांच्या मागे दिसणारे गोल गोल झुपकेदार पांढरे ढग इत्यादींमुळे आकाशगमनाच्या वेगाचा भास निर्माण झालेला आहे. उजळ वर्ण, रत्नखचित, वैभवशाली मुकू ट आणि आभूषणे यामुळे देवेंद्र इतरांपेक्षा वेगळा उठून दिसतो



क्र. १७ या गुहेतील 'आकाशसंचारी अप्सरा' हे दुसरे उल्लेखनीय चित्र. तिच्या गळ्यात चौकोनी नीलमणी गुंफलेला मोठ्या मोत्यांचा कंठा आहे. त्याखाली हिरे, इंद्रनील यांचा रत्नखचित सुंदर हार आहे. त्यातून लहान लहान मोत्यांची पेंडी खाली लोंबत आहेत. तिची कर्णभूषणे, तिच्या डोक्यावरील मंदिलावर घातलेले विविध अलंकार तत्कालीन कारागिरांच्या उत्कृष्ट कौशल्याचे



निदर्शक आहेत.

क्र. १९ चा चैत्य ५ व्या शतकातील असून तो कोरीवकामाने भरलेला आहे. त्यात दोन लहान मंदिरेही आहेत. उजव्या बाजूच्या गर्भगृहात वर्तुळाकार स्तंभ असून त्यावर फिरत्या खोवण्या खोदल्या आहेत. स्तंभशीर्षे चौकोनी असून त्यावर पुष्पालंकृत रचना व फळांचे शिल्पपट्ट आहेत. मागील भिंतीवर बुद्धाची मूर्ती आहे. चैत्यगवाक्ष कोरले आहेत. गताक्षाच्या दोन्ही बाजूस पक्षमूर्ती असून चैत्यगृहाच्या भिंतीवर बुद्धप्रतिमा रंगविल्या आहेत. येथील नागराज व राणीची मूर्ती उच्च शिल्पकलेची निदर्शक आहे.



अजिंठ्याच्या लेण्यांतील बरीचशी चित्रकला आज आपल्यापुढे नाही. क्र. १, २, १६, १७ व थोड्या प्रमाणात १९ याच लेण्यांतील चित्रकला अद्यापि बव्हंशी अबाधित राहिली आहे. येथील चित्रप्रसंग जरी बुद्धाच्या जीवनावर आधारित असले तरी त्या सर्वांतून तत्कालीन समाजजीवनाच्या विविध अंगांवर प्रकाश पडतो. अजिंठ्याच्या चित्रांचे विशेष म्हणजे तेथे विविधता विपुल आहे. तत्कालीन वास्तु, वेशभूषा, अलंकार, खेळ, मनोरंजनाची साधने, वाद्ये, आयुधे यांच्या विविधतेवरून समाजजीवन सुखी आणि समृद्ध होते. याबद्दल शंका नाही. गुप्तकाळातील सुवर्णयुगाची साक्ष यावरून पटते. चित्रांप्रमाणेच शिल्पेही विविध तशीच भावपूर्ण आहेत. बुद्धाचे परिनिर्वाण, नागदंपतीचे शिल्प, मकरमुखे, शालभंजिका यावरावेर सुबक नक्षीकामही रसिकतापूर्ण शिल्पकला दर्शविते. अजिंठ्याच्या चित्रांनी चित्रकलेच्या इतिहासात अढळपद मिळवले आहे.


**संदर्भ ग्रंथ**

- विश्वकोश
- संस्कृती कोश
- History of Indian and Western Art & Arciotecture - Edith & Tomary.
- भारतीय कलेचा इतिहास - श्री. ह. शहाणे



- संकलन

सौ. मंजिरी दांडेकर

कलाशिक्षक, डॉ. बेडेकर विद्या मंदिर


**दिशाच्या पुढील अंकापासून**

**डॉ. मो. दि. पराडकर**

**यांचे आत्मकथन**

**क्रमशः प्रसिद्ध होणार आहे.**

पुस्तक परिचय

# विश्वमोहिनी गीता

## (गीताविषयक प्रश्न आणि उत्तरे)

(लेखक - डॉ. श्रीराम भातखंडे, प्रकाशक - श्री. द्वारकाधीश चॅरिटीज, कर्नाळा, जि. रायगड, जून २००२, पृष्ठे-१५६, मूल्य - १०० रु.)

प्रकाशकाच्या निवेदनात, अजूनही हिंदू समाजात गीतेबाबत अज्ञान व अनभिज्ञता दिसून येते, ही त्यांच्या मनात सतत सलणारी व्यथा त्यांनी बोलून दाखवलीय व त्या गीताविषयक कळकळीतूनच 'विश्वमोहिनी गीता' या पुस्तकाचा जन्म झालाय. श्री. श्रीराम भातखंडे यांनी पूर्वी गीतेसंबंधी प्रश्नोतरी स्वरूपातली 'गीता सुगीता कर्तव्या' या शीर्षकाची लेखमाला लिहिली होती. सर्वसामान्यांच्या मनात उभे राहणारे प्रश्न, शंका यांची उत्तरे लेखकाने देण्याचा प्रयत्न या लेखमालेद्वारे केला होता. १९८९ ते १९९२ या काळात २० लेख ठाणे येथून स्वामी समर्थ परिवारातर्फे निघणाऱ्या 'स्वामिन् तव शरणम्' या द्वैमासिकातून प्रसिद्ध झाले होते. ते वीस लेख व इतर पुष्कळ नवीन प्रकरणे घालून हे पुस्तक तयार झालेय.

गीतेवर असंख्य पुस्तके असताना आणखी हे पुस्तक कशाला, असा प्रश्न लोकांना पडला तर त्याचे उत्तर 'प्रस्तुत पुस्तकाविषयी' यात लेखकाने देऊन टाकले आहे. प्रस्तुत पुस्तकात पाच क्रमांकाच्या लेखानंतर सहाव्या क्रमांकावर गीतेचा अध्याय पहिला सुरू होतो. त्यामुळे काय झालेय बघा. उदा. पान २१ वर पहा. ६. अर्जुनविषादयोग (श्लोकसंख्या ४७) अध्याय पहिला (लहान टाइपात) वाचकाला त्यामुळे ठळक अक्षरातला ६ प्रकरण क्रमांक व अध्यायाचे नाव प्रथमदर्शनी दृष्टी टाकताच दिसते. त्यामुळे क्रमांक व अध्याय संगती चुकलीय की काय असे त्यांच्या मनात आले तर ते गैर नाही. अध्याय पहिला ही खाली बारीक टाइपातली अक्षरे नंतर दिसतात. पुढे हे माहीत झाल्यावरही दर अध्यायाला नजरेला हे खटकतेच. मन तिथे अडखळतेच. ही विसंगती लेखकाने पुढील आवृत्तीत सुधारावी (त्यांना मान्य झाल्यास.)

दुसरे परिशिष्ट - ५, २९. 'घरोघरी पार्थसारथी असावा' यात त्यांनी जे अभ्यासकांना सांगितलेय की कर्मप्रवृत्त करणे हाच गीतेचा प्रधान हेतू आहे. म्हणून गलितगात्र हातपाय गाळून श्रीकृष्णापुढे बसलेल्या अर्जुनाचे चित्र घरात लावणे उपयुक्त होणार नाही. तर गीतोपदेश ऐकल्यावर धनुर्धारी अर्जुनाचे शत्रूसैन्यावर त्वेषाने बाणांचा वर्षाव करीत आपले कर्म करीत असलेला आणि त्याच्यापुढे त्याचा सारथी म्हणून योगेश्वर श्रीकृष्ण आहे असे श्रीकृष्ण -अर्जुनाचे चित्र लावावे, त्यामुळे नेहमी कर्म करीत राहण्याची प्रेरणा मिळेल, असे लेखकाला एका सत्पुरुषाने सांगितले आहे. तर असे लेखकाने आपल्याच पुस्तकावर चित्र का घेतले नाही? (मुखपृष्ठावर) त्यामुळे तर त्यांचा हेतू साध्य व्हायला फार उपयोग झाला असता (असे मला नम्रपणे सुचवावेसे वाटते व या सुधारणा त्यांनी पुढील आवृत्तीत कराव्यात.)

परिशिष्ट -१, २५. 'गीतेतील पुष्पिका' हे नाव त्यांनी गीतेतील दर अध्यायाच्या शेवटी 'इति श्रीमद्भगवद्गीतासु उपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे....' अशा येणाऱ्या ओळीला दिले आहे. पुष्कळ विद्वानांनी या ओळीला 'संकल्प' म्हटले आहे, पण समाप्तिदर्शक ओळीला 'संकल्प' म्हणणे योग्य नाही. कारण संकल्प हा कार्यारंभी करायचा असतो. म्हणून समाप्तिदर्शक ओळीला पुष्पिका म्हणणे हेच योग्य आहे असे लेखकाचे म्हणणे आहे. त्यांनी योजलेला 'पुष्पिका' हा काव्यमय शब्द आवडला हे मुद्दाम सांगावेसे वाटते.

पुष्पिकेत गीतेला उपनिषद म्हटले आहे. उप+नि+सद् ही उपनिषद शब्दाची फोड. उप-जवळ, नि-खाली आणि सद् - बसणे. आपल्या गुरूजवळ एकान्तात योग्य स्थानावर (खाली) ज्ञान संपादन करण्यासाठी निष्ठापूर्वक बसणे म्हणजे उपनिषद्. अशा तऱ्हेने संपादन केलेल्या ज्ञानाला उपनिषद ही संज्ञा प्राप्त झाली. अर्जुन खरोखरच रथात श्रीकृष्णाजवळ खाली बसला होता व श्रीकृष्णाने त्याला उपदेश केला. उपनिषद शब्दाच्या अर्थाप्रमाणेसुद्धा गीतेचे उपनिषद नाव सार्थ आहे. (या अर्थाने त्यांनी मुखपृष्ठ ठेवले असेल तर योग्यच आहे. पण त्यांनीच म्हटल्याप्रमाणे 'घरोघरी पार्थसारथी असावा' असे चित्र विद्यावाचस्पती श्री शंकर अभ्यंकर यांच्या 'गीतासागर' वर आहे. (पुढे या पुस्तकाचा परिचय आपण करून घेणार आहोतच.) उपनिषदांप्रमाणे गीतेतही ब्रह्मविद्या व योगशास्त्र आहेच. गीता सांगणारा श्रीकृष्ण हा योगेश्वर आहे. ही माहिती उपयुक्त आहे. 'कृष्णवन्दे जगद्गुरुम' यात कृष्णचरित्र दिले आहे. 'गीता आणि महाभारत' हे प्रकरणही उद्बोधक आहे.

गीतेवर अनेक ग्रंथ आहेत; परंतु या सर्व ग्रंथांपेक्षा निराळ्या पद्धतीने आणि नावीन्यतेने म्हणजे प्रश्नोत्तर रूपाने गीतेचा आशय आणि महत्त्व सादर करण्याचा प्रयत्न या पुस्तकात केला आहे, असे पुस्तकाचे वैशिष्ट्य लेखकानेच विषद केले आहे. प्रथम गीतेविषयी परिचयात्मक प्रश्नोत्तरे नंतर अध्यायावर आधारित प्रश्नोत्तरे व शेवटी समालोचनात्मक प्रश्नोत्तरे दिली आहेत. गीतेचे विविध पैलू प्रश्नोत्तरांच्याद्वारे वाचकांपुढे यावेत, हा त्यामागे लेखकाचा हेतू आहे. काही प्रश्नांचा उल्लेख मुद्दाम करते.

प्रश्न १ ला - गीतेला भगवद्गीता हे नाव कसे पडले आहे ?

प्रश्न २ रा - सौतीचा महाभारताशी किती सहभाग आहे?

प्रश्न ७ वा - गीता महाभारतातील प्रक्षिप्त भाग आहे का?

प्रश्न १० वा - पुष्कळ वेळा टीका आणि भाष्य हे शब्द अध्यात्मग्रंथाच्या संबंधात वापरले जातात. परंतु त्याचा नक्की अर्थ काय गीतेच्या काळासंबंधी प्रश्न माहितीच्या दृष्टीने उपयुक्त आहेत.

प्रश्न ९८ वा - या अध्यायात कुंडलिनीचा कोठेही उल्लेख नसताना ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीचा सबंध सहावा अध्याय कुंडलिनीभोवती कसा विणला ?

प्रश्न १२३ वा - शुक्ल व कृष्ण गतीविषयी या अध्यायात काय म्हटले आहे?

वरील प्रश्नांच्या उत्तरातून आपल्या ज्ञानात भरच पडते. संस्कृत भाषा व वेदान्त तत्त्वज्ञान याचा व्यासंग श्री. भातखंडे यांनी अध्ययन, अध्यापन, वाचन व लेखन याद्वारे जोपासला आणि वृद्धिंगत केला आहे. त्यांचा परिचय मलपृष्ठावर वाचक वाचतीलच. गीता, ब्रह्मसूत्रे व उपनिषद हे त्यांच्या जीवनाचा अविभाज्य भाग झाले आहेत. ठाण्यात अध्यात्मवर्गाच्या रूपाने त्यांचे ज्ञानदानाचे मौलिक कार्य अविरत सुरू आहे.

कृष्णभक्ती या प्रकाशक व लेखक यांच्यातील समान दुव्यामुळे या दोघांच्या प्रयत्नांतून हे कृष्णकार्यच घडले आहे. पुस्तकात परिशिष्टानंतर विषयसूची व निवडक ग्रंथसूची शेवटी दिली आहे. लेखकाचा व्यासंग दांडगा आहे, याची कल्पना अनेक प्रश्नांच्या उत्तरातून येते. प्रश्नोत्तर स्वरूपामुळे अभ्यासकांना हे पुस्तक निश्चितच उपयोगी पडेल. पांडित्य प्रदर्शन नसूनही ज्ञानात भर टाकणारं असं हे मौलिक पुस्तक आहे. सामान्य लोकांनी व अभ्यासकांनी याचा जरूर लाभ घ्यावा.

**आशा भिडे**
बी/९, विजय अपार्टमेंटस्,
'आराधना' टॉकीजजवळ,
ठाणे (प.) - ४०० ६०२.
दूरध्वनी : २५४१ ०१४०

# साहित्य जगत

## नाविन्यपूर्ण योजना - एक अभ्यासपूर्ण पुस्तक

**(प्रभावी आणि परिणामकारक पोलीस व्यवस्थापनाच्या नाविन्यपूर्ण योजना)**

पोलीस दलाचे कामकाज दिवसेंदिवस फार गुंतागुंतीचे, किचकट आणि तणावपूर्ण बनत चाललेले आहे. पोलिसांचे कामकाज प्रभावीपणे करता यावे, नोकरीतील धोके टाळून करिअर यशस्वी करता यावे, या उद्देशाने श्री. सुरेश आबाजी खोपडे (IPS) यांनी अनेक वर्षे संशोधन करून आधुनिक व्यवस्थापन सिद्धांतावर आधारित अनेक प्रयोग पोलीस दलात सुरू केले. (श्री. सुरेश खोपडे यांनी १९९२ मध्ये 'भिवंडी दंगल - १९८४' हे पुस्तक लिहिलेले आहे.) त्यावेळी त्यांनाही असे वाटत होते की पोलीस कर्मचारी म्हणावे तसे काम का करीत नाहीत? लोक म्हणतात, पोलिसांना राहायला घरे नाहीत, २४-२४ तास काम करावे लागते, राजकीय हस्तक्षेप असतो, पुरेसा पगार नसतो वगैरे वगैरे. परंतु हे पूर्णसत्य नव्हे असे त्यांच्या लक्षात आले. १९८७ साली त्यांनी एका व्यवस्थापन कार्यशाळेमध्ये हजेरी लावली होती. पुढे १९९४-९५ मध्ये त्यांचे मत पूर्णपणे बदलले. इतर कंपन्यांतील व्यवस्थापन व पोलीस दलातील व्यवस्थापन यामध्ये आमूलाग्र फरक आहे म्हणून त्यांनी व्यवस्थापनशास्त्रावरील अनेक पुस्तके अभ्यासली. अभ्यासाअंती त्यांच्या असे लक्षात आले की, मधल्या फळीतील अधिकारी पोलीस दलाचे व्यवस्थापन खूप जुनाट, कालबाह्य व रानटी पद्धतीने करीत आहेत.) त्याची सुरुवात राज्य राखीव पोलीस बल गट क्र.१, पुणे येथे करून सातारा, अकोला व राज्य राखीव पोलीस बल गट क्र.९, अमरावती येथे हे प्रयोग प्रत्यक्ष राबविले. त्यावर आधारित म्हणजेच प्रस्तुतचे 'नाविन्यपूर्ण योजना' हे पुस्तक आहे.

**नाविन्यपूर्ण योजना**

स्नेह प्रकाशनाने हे पुस्तक (पृ. २३२, मूल्य रु. २५०/-, प्र. आ. ऑक्टो. २००२) प्रसिद्ध केलेले आहे. पुस्तकाच्या संपादनात युनिक फीचर्स (पुणे) च्या सुहास कुलकर्णी यांनी मदत केलेली आहे. या पुस्तकात श्री. खोपडे यांनी राबविलेल्या नाविन्यपूर्ण योजनांची सविस्तर माहिती आहे. आपल्या प्रस्तावनेत ते म्हणतात, 'कायदा व सुव्यवस्थेचे वेगवेगळे प्रश्न हाताळताना काय भूमिका घ्यावी, पोलीस स्टेशनमध्ये प्रभारी अधिकारी म्हणून काम करताना मानवी संबंध कसे ठेवावेत, स्वत:च्या व आपल्या सहकाऱ्यांच्या अंगभूत गुणांचा विकास कसा करावा, कामाचे व व्यक्तिगत विकासाचे नियोजन कसे करावे, उत्कृष्ट संघटन कसे करावे, ताणतणाव कसा नियंत्रित करावा, सोबतच्या सहकाऱ्यांना आणि कर्मचाऱ्यांना कार्यप्रेरित कसे करावे, याबाबत सविस्तर व सखोल मांडणी केलेली आहे. कार्यप्रेरणेबद्दलचे अनेक सिद्धांत सोप्या भाषेत सांगून त्याचा पोलीस दलाची कार्यक्षमता वाढविण्यासाठी कसा वापर करता येईल, याबद्दल व्यावहारिक उदाहरणे देऊन स्पष्टीकरण केलेले आहे. पोलीस दलातील नोकरी यशस्वी करीत असताना व्यक्तिगत विकास साधून जीवन सुखकर करण्यासाठी योग्य त्या मार्गाची चर्चा केलेली आहे.

पोलीस व्यवस्थापनाच्या सीरिजमधील हे पहिले पुस्तक आहे. या पुस्तकातील भाग -१ मधील सर्व प्रयोग प्रत्यक्षपणे राबविलेले आहेत. (पृ. १ ते १२७) त्यांच्या या सर्व प्रयोगांना अपेक्षित भरघोस यश मिळालेले आहे. भाग २ मध्ये (१२९ ते २३२) व्यवस्थापकीय कौशल्य वाढविण्यासाठी काल्पनिक उदाहरणे दिलेली आहेत. हे पुस्तक लिहिताना श्री. खोपडे यांच्यासमोर जो वाचकवर्ग आहे तो विशेषत: पोलीस दलातील मधल्या फळीतील व्यवस्थापक म्हणजे पोलीस सब-इन्स्पेक्टर ते उप-विभागीय अधिकारी आणि तळाचे पोलीस कर्मचारी म्हणून प्रत्येक पोलीस शिपाई ते पोलीस अधीक्षक यांनी हे पुस्तक अवश्य संग्रही ठेवावे.

या पुस्तकातील 'कार्यप्रेरणेबद्दलचे महत्वाचे सिद्धांत'

हे भाग १ मधील प्रकरण अत्यंत महत्त्वाचे आहे. एल्टन मायो (सायकॉलॉजिस्ट) मक ग्रेगर, चेस्टर बरनार्ड या नामवंतांचे वर्गहम मास्लो सिद्धांत त्यात सांगितलेले आहेत.

या सीरिजमधील दुसरे पुस्तक 'पोलीस प्रशासनाची नवी दिशा' हे प्रकाशनाच्या वाटेवर आहे. श्री. खोपडे यांची सर्व कारकीर्द कर्तृत्वाने ओतप्रोत भरलेली आहे. त्यांनी अनेक सन्मानचिन्हे मिळविलेली असून भिवंडी प्रयोग, कम्युनिटी पोलिसिंग व खोपडे पॅटर्न या विषयांवर त्यांनी भारतातल्या व जगातल्या नामवंत संस्थांमध्ये भाषणे दिलेली आहेत. श्री. सुरेश खोपडे, स्नेह प्रकाशन व श्री. सुहास कुलकर्णी (युनिक फीचर्स) यांचे अभिनंदन !

## साहित्य कलायात्री

(संपादक दादासाहेब लोणकर,
साहित्य कलायात्री, 'कलायात्री भवन',
केशवनगर, मुंढवा, पुणे-३६
दूरध्वनी - २६८१६०८४)

हे सर्वसामान्य वाचकांचे एक लोकप्रिय मासिक आहे. एप्रिल, २००४ मध्ये मासिक दहाव्या वर्षात पदार्पण करीत आहे. भारतातल्या जवळजवळ सर्व राज्यांत व अंदमान-निकोबार व परदेशातील काही प्रमुख संस्थांमध्ये हे मासिक जाते. नवोदित कवींना व लेखकांना प्रोत्साहन देऊन त्यांच्या सुप्त कलेला 'साहित्य कलायात्री'तून वाव देण्याचे मासिकाचे कार्य अत्यंत कौतुकास्पद आहे.

### नवोदित मराठी साहित्य परिषद

नवोदित मराठी साहित्य परिषदेची स्थापना हे संपादक श्री. दादासाहेब लोणकर यांचे महत्त्वाचे कार्य आहे. आजवर परिषदेने अनुक्रमे कै. वसंत बापट, द.मा. मिरासदार, कविवर्य नारायण सुर्वे, कविवर्य मंगेश पाडगावकर, 'मृत्युंजय'कार कै. शिवाजी सावंत, कविवर्य कै. सुरेश भट, विश्वास पाटील ('पानिपत'कार) व कविवर्य फ.मु. शिंदे होते. आता नववे राष्ट्रीय नवोदित मराठी-कोकणी साहित्य संमेलन २२ व २३ मे २००४ रोजी पुण्यात सुप्रसिद्ध लेखक प्रा. केशव मेश्राम यांच्या अध्यक्षतेखाली उद्यान प्रसाद कार्यालय, सभागृह, एस.पी. कॉलेजसमोर स्काऊट ग्राऊंड शेजारी, सदाशिव पेठ, पुणे - ३० येथे होणार आहे. उद्घाटन सोहळ्यास महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा. सुशीलकुमार शिंदे व गोव्याचे मुख्यमंत्री मा. मनोहर पर्रीकर आणि अनेक नामवंत साहित्यिक उपस्थित राहणार आहेत. या संमेलनास उपस्थित राहू इच्छिणाऱ्या साहित्यप्रेमींनी वरील पत्त्यावर संपर्क साधावा. विशेष सवलती याची माहिती करून घ्यावी.

### नवोदित लेखकांसाठी अनुदान योजना

मराठी, हिंदी, उर्दू, इंग्रजी, गुजराती व कोकणी भाषेतील नवोदित लेखक व कवींची पुस्तके पन्नास टक्के सहकार योजनेअंतर्गत योजना गेल्या चौदा वर्षांपासून राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत आतापर्यंत सातशे नवोदित लेखक, कवी व साहित्यकांची पुस्तके प्रकाशित करण्यात आली आहेत. यावर्षीही अशी पुस्तके प्रकाशित करण्यात येणार आहेत. २१२१ कवींच्या २१२१ कवितांच्या विश्वविक्रमी 'प्रेमसागर' या मराठी प्रातिनिधिक काव्यसंग्रहाचे प्रकाशन २२.५.०४ रोजी भरणाऱ्या संमेलनात करण्यात येणार आहे.

### विविध स्पर्धांसाठी विविध पुरस्कार

काव्यक्षेत्रातील नवोदित कवींसाठी 'कविवर्य जगदीश खेबुडकर' पुरस्कार पंचवीस हजार रु. चा, 'कविवर्य नारायण सुर्वे पुरस्कार', राज्यस्तरीय कथालेखन स्पर्धा आयोजित करण्यात आलेली आहे. या सर्वांसाठी अंतिम तारीख १०-४-२००४ आहे. या स्पर्धेत भाग घेऊ इच्छिणाऱ्यांनी तातडीने उपरोक्त पत्त्यावर संपर्क साधावा.

मासिकाच्या सल्लागार मंडळावर सर्वश्री डॉ. यू. म.पठाण, डॉ. गंगाधर पानतावणे, प्रा. चंद्रकुमार नलगे, दत्ता हलसगीकर इ. नामवंत साहित्यिक आहेत. 'साहित्य कलायात्री' हे मासिक नवोदित कवी - लेखकांसाठी उत्तम व्यासपीठ आहे. सर्वसामान्यांसाठी ते उपयुक्तही आहे.

- शरद जोशी
(ग्रंथप्रसारक)

# परिसर वार्ता

*१४ एप्रिल रोजी डॉक्टर वा. ना. बेडेकर गेले आणि एक इतिहास संपला. कायम स्वप्ने पाहणारे तरुण मन आणि ती साकार करण्यासाठी अविरत काम करणारे हात असलेला, जीवनातील सर्वच मैफलींना 'उद्याचे' गीत देणारा संवेदनशील माणूस नाहीसा झाला. आधारवड कोसळला आणि वि. प्र. मंडळाचा परिवार पोरका झाला. परिसर असा विवक्षण सुन्न झाला. त्याविषयी...*

**प्र. ग. वैद्य यांनी लिहिलेला वृत्तांत**

ठाण्यातील 'विद्याप्रसारक मंडळ, ठाणे' या नामवंत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष, ठाणे भारत सहकारी बँकेचे एक संस्थापक व माजी अध्यक्ष, उत्कर्ष मंडळ ठाणे, सत्कर्म प्रतिष्ठान, ठाणे इत्यादी अनेक सामाजिक कार्य करणाऱ्या संस्थांचे प्रणेते आणि ठाण्यातील एक नामवंत डॉक्टर वा. ना. बेडेकर यांचे बुधवार दि. १४ एप्रिल २००४ रोजी दुपारी अल्पशा आजाराने देहावसान झाले. दि. २० फेब्रुवारी रोजी त्यांनी आपल्या वयाची ८७ वर्षे पूर्ण करून वयाच्या ८८ व्या वर्षात पदार्पण केले होते. अमाप लोकप्रियता मिळविणाऱ्या डॉक्टरांच्या अंत्ययात्रेस त्या दिवशी प्रचंड जनसमुदाय जमला होता.

स्मशानात त्यांच्या आठवणी सांगणारी मान्यवरांची भाषणे झाली. अंत्ययात्रेच्या दरम्यान उत्कर्ष मंडळ, ठाणे भारत सहकारी बँक, डॉ. बेडेकर विद्यामंदिर, ठाणे महाविद्यालय येथे त्यांचे पार्थिव ठेवण्यात आले.

**आदरांजली**

दिवंगत डॉक्टरांना ठाणेकरातर्फे श्रद्धांजली वाहण्यासाठी विद्या प्रसारक मंडळाने रविवार दि. १८ एप्रिल रोजी सायंकाळी ५ वाजता डॉ. बेडेकर विद्या मंदिर (ए. के. जोशी विद्यालयाचे सभागृह) नौपाडा-ठाणे येथे एका शोकसभेचे आयोजन केले होते. या शोकसभेस डॉक्टरांनी स्थापन केलेल्या व त्यांच्याशी संबंधित असलेल्या संस्थांतील सर्व सदस्य, डॉक्टरांचे पेशंट, त्यांचा मित्रवर्ग व नातेवाईक मंडळी खूप मोठ्या संख्येने उपस्थित होते. सभामंचकावर डॉक्टरांचे चिरंजीव तथा वि. प्र. मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर, वि. प्र. मंडळाचे उपाध्यक्ष श्री. वि. करंदीकर, वि. प्र. मंडळाचे कोषाध्यक्ष तथा ठाणे भारत सहकारी बँकेचे अध्यक्ष मा. य. गोखले इत्यादी पदाधिकारी तथा मान्यवर उपस्थित होती. वि.प्र. मंडळाचे कार्यवाह तथा भारत सहकारी बँकेचे एक संचालक उत्तम जोशी यांनी या शोकसभेचे अत्यंत योग्य प्रकारे संचालन केले. सभामंचकावर डॉ. बेडेकरांचा एक मोठा फोटो (छायाचित्र) लावून त्याला पुष्पहार घालण्यात आला होता.

बरोबर सायंकाळी ५ वाजता डॉ. बेडेकरांच्या फोटोस हार घालण्यात आला व शोकसभेस प्रारंभ झाला. सभेचे संचालक उत्तम जोशी यांनी आपल्या प्रास्ताविकात सभेच्या आयोजनाचे प्रयोजन सांगितले व डॉक्टरांबद्दल थोडक्यात ते करीत असलेल्या कार्यांचा उल्लेख केला. प्रचंड कार्य करणारे डॉक्टर प्रसिद्धीपासून दूर राहात असत. त्यांची नर्सिंग कॉलेज व मेडिकल कॉलेज सुरू करण्याची फार इच्छा होती, असेही त्यांनी सांगितले.

नंतर आपल्या मनोगतात श्री. वि. करंदीकर म्हणाले, 'ही शोकसभा डॉक्टरांच्या वयाच्या १०० व्या वर्षानंतर व्हावयास हवी होती, करंदीकरांनी डॉक्टरांच्या लहानपणापासूनचा त्यांचा परिचय आपल्या भाषणातून करून दिला. नंतर ते म्हणाले, 'मूर्ती लहान व कीर्ती महान', 'मरावे परी कीर्तीरूपे उरावे', डॉ. बेडेकर म्हणजे व्यक्ती नसून महान शक्ती होती.'




सौ. सुमेधा बेडेकर श्रद्धांजली वाहताना.

त्यानंतर डॉक्टरांबरोबर मंडळाच्या स्थापनेपासून भरपूर कार्य करणारे मंडळाचे माजी कार्यवाह मा. ना. पाटील मनोगत व्यक्त करण्यास उठले पण त्यांचा कंठ दाटून आला, त्यांच्या डोळ्यातून अश्रू येऊ लागले. पण तशाही स्थितीत त्यांनी डॉक्टरांच्या स्वभावाची व त्यांच्या कार्य करण्याच्या पद्धतीतील अनेक वैशिष्ट्ये सांगितली. डॉक्टर हे एक आदर्श व्यक्तिमत्त्व होते. त्यांनी पैशासाठी रोग्याला कधी अडविले नाही, इत्यादी अनेक गोष्टींचा त्यांनी उल्लेख केला. शेवटी ते म्हणाले की, महाविद्यालयाच्या परिसरास 'डॉ. वा. ना. बेडेकर ज्ञानदीप ' असे नाव द्यावे'

या शोकसभेत सुमारे २८ जणांनी आपली मनोगते व्यक्त केली. त्यात अशोक चिटणीस, प्रा. स. वा. गोखले, मा. य. गोखले, एस्. एम्. इंजिनीअर, एस्. एस्. मुजुमदार, प्रा. श्री. दा. मुळगांवकर, ग्रंथपाल मोहन पाठक, डॉक्टरांची सून सौ. सुमेधा बेडेकर, मुख्याध्यापिका सौ. सविता केळकर, प्रा. सौ. पेजावर, कॅन्टीन संचालक श्री. साठले, ए. के. जोशीच्या मुख्याध्यापिका सौ. कालिंदी कोल्हटकर, प्राथमिकच्या मुख्याध्यापिका श्रीमती अनुराधा मळेकर, डॉक्टरांच्या विवाहित कन्या सौ. माणिक वापट, डॉ. श्रीराम भातखंडे, डॉ. प्रभाकर केळकर, म. ग्रं. संग्रहालयाचे अध्यक्ष पां. के. दातार, मधुकर जोशी, एन्. जी. धर्माधिकारी, अश्विन बसावडा, श्री. भट, डॉ. विजय बेडेकर व डॉ. मो. दि. पराडकर यांचा समावेश होता.

### बांदोडकर विज्ञान महाविद्यालय

महाविद्यालयात झालेल्या शोकसभेत श्री. प्रकाश महाराव, श्री. बबन जाधव, श्री. श्रीकांत जठार, श्री. रामचंद्र मिसाळ, डॉ. सौ. सुचेता वोंडगिरी, प्रा. पोद्दार, प्रा. मोहन पाठक, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. मकरंद दीक्षित यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. प्रभारी प्राचार्या सौ. माधुरी पेजावर यांनीही डॉक्टरांच्या आठवणींना उजाळा दिला. दोन मिनिटे स्तब्धता पाळून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

### कला-वाणिज्य महाविद्यालय

महाविद्यालयाच्या शिक्षक कक्षात झालेल्या श्रद्धांजली सभेतही प्राध्यापकांनी आपले अनुभव सांगितले. प्राचार्य स. वा. गोखले यांनी डॉक्टरांच्या आठवणींना उजाळा दिला. दोन मिनिटे स्तब्धता पाळून श्रद्धांजली वाहण्यात आली.

### तंत्रनिकेतन

विद्याप्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनात १५ एप्रिल २००४ रोजी सकाळी १०.३० वाजता शोकसभा आयोजित केली होती. याप्रसंगी प्राचार्य श्री. मुजुमदार व उपप्राचार्य श्री. नायक यांनी आपली भावना व्यक्त केली. यावेळी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. काहीजणांनी आपापली मनोगते व्यक्त केली व दोन मिनिटे सर्वांनी स्तब्ध उभे राहून या थोर व्यक्तीला श्रद्धांजली अर्पण केली.

---

### डॉ. बेडेकर विद्यामंदिर (मा.वि.)

दि. २३ नोव्हें. २००३ रोजी घेण्यात आलेल्या राज्यस्तरावरील राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षेचा निकाल २२ मार्च २००४ रोजी जाहीर झाला. दुर्गेश अनिल देशपांडे (१०अ) याची राष्ट्रीय स्तरावरील राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षेसाठी निवड झाली.

सप्टेंबर २००३ मध्ये घेण्यात आलेल्या शासकीय चित्रकला परीक्षेचे निकाल नुकतेच जाहीर झाले. एलिमेंटरी ग्रेड परीक्षेत कु. सागर वसंत धावडे (८अ) याला 'ए' ग्रेड प्राप्त झाली असून राज्याच्या गुणवत्ता यादीत तो २१ व्या क्रमांकावर चमकला व भूमिती या विषयाचे पारितोषिक जाहीर झाले. विराज विजय दामले (८अ) यासही 'ए' ग्रेड प्राप्त झाली. ११ विद्यार्थ्यांना 'बी' श्रेणी व एकूण निकाल ७५% लागला. इंटरमिजिएट ग्रेड परीक्षेस कु. प्रज्ञा विठ्ठल चव्हाण (९अ) हिला 'ए' श्रेणी व नेहा हिंदळेकर (९ब) हिला बी श्रेणी प्राप्त होऊन निकाल ५५% लागला. रोटरी क्लब ऑफ ठाणे आयोजित कार्टून पेंटिंग स्पर्धेत सात्त्विक प्रमोद पेणकर (७अ) यास पारितोषिक प्राप्त झाले.

### गीतेश शिंदे यांचे अभिमानास्पद यश

'शब्दवेध' काव्यसंग्रहाच्या प्रकाशनानिमित्त मुंबई नागरिक समितीतर्फे आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय काव्यलेखन स्पर्धेत प्रथम पारितोषिक मिळाले आहे. या स्पर्धेत राज्यभरातून ७३ स्पर्धक सहभागी झाले होते. या सोहळ्यात ज्येष्ठ नाटककार प्र.ल.मयेकर यांच्या हस्ते गीतेश शिंदे यास सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमास प्रसिद्ध कवी श्री. अरुण म्हात्रे व 'कुटुंब रंगलंय काव्यात'चे सादरकर्ते विसुभाऊ बापट यावेळी उपस्थित होते. तसेच या शानदार समारंभास विशेष अतिथी म्हणून नाट्य आणि सिने कलाकार श्री. अविनाश नारकर व सौ. ऐश्वर्या नारकर, श्री. अरुण नलावडे आदी मान्यवर देखील उपस्थित होते. यावेळेस गीतेशने सादर केलेल्या कवितेचे सर्वांनी कौतुक केले. गीतेशला साहित्यप्रांतात यापूर्वीही कविवर्य मंगेश पाडगावकर, नारायण सुर्वे, जयंतराव साळगावकर आदी मान्यवरांच्या हस्ते विविध स्पर्धांतून पारितोषिके मिळाली आहेत.

### विद्याप्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन
### आमचे ध्येय-उत्तमप्रतीच्या तंत्रज्ञानाचे योगदान
### ॲक्रिडिटेशनचा अहवाल

१९८३ साली सुरु झालेल्या विद्याप्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनाला राष्ट्रीय प्रत्यायन मंडळातर्फे (नॅशनल बोर्ड ऑफ ॲक्रिडिटेशन) ॲक्रिडिटेशन देण्यात आले आहे. मुंबई विभागातील विना अनुदानित संस्थांतील ॲक्रिडिटेशन मिळालेली ही पहिली आणि अग्रगण्य अशी संस्था आहे.

'ॲक्रिडिटेशन' मिळणे म्हणजे काय? असा प्रश्न सहज उद्भवणारच! त्याबाबत थोडी सविस्तर माहिती घेऊया.

देशातील सर्वच तांत्रिक शिक्षण देणाऱ्या संस्था आता 'अखिल भारतीय तांत्रिक परिषदेच्या' अधिपत्याखाली येतात. अखिल भारतीय तंत्र परिषदेने तंत्रशिक्षणाचा दर्जा ठरविण्यासाठी राष्ट्रीय प्रत्यायन मंडळ (NBA) हे स्थापन केलेले आहे.

**या मंडळाचे कार्य**

आपल्या देशातील AICTE ने पदविका, पदवी व पदव्युत्तर शिक्षण देणाऱ्या संस्थांची काही विशिष्ट निकष ठरवून त्या संस्थांचे अवलोकन करण्याचे महत्त्वाचे कार्य NBA ला दिलेले आहे.

**ॲक्रिडिटेशनचा मुख्य उद्देश :**

१. तांत्रिक शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना व त्यांच्या पालकांना या मंडळाने ठरविलेल्या निकषांवर उतरलेल्या संस्थांची माहिती देणे.

२. तांत्रिक शिक्षण देणाऱ्या संस्थांचा दर्जा सुधारण्यासाठी मदत करणे व नवीन अभ्यासक्रम विकसित करणे.

३. आपल्या देशातील तांत्रिक शिक्षणाचा दर्जा सातत्याने वाढविण्यासाठी नवीन नवीन उपक्रम हाती घेणे व त्यासाठी उपाय योजना आखणे.



डावीकडून बसलेले डॉ. मिसेस गायत्री अग्निहोत्री, डॉ. विनोदकुमार, डॉ. एस्. के. भारद्वाज, डॉ. जी. एल्. दत्ता, प्रा. एस्. एस्. उपाध्याय, प्रा. सिद्धार्थ दत्ता, प्रा. पी. के. बॅनर्जी, प्रा. आर. के. झा, प्रा. ए. के. रॉय

डावीकडून मागे उभे असलेले - प्रा. सौ. व्ही.ए. जोशी, प्रा.सौ. राघवन, प्रा. सौ. आगाशे, प्रा.श्री. मोहिते पाटील, प्रा. श्री. कुलकर्णी, प्राचार्य श्री. मुजुमदार, उपप्राचार्य श्री. नायक, प्रा. सौ. वहेर (इ.पी.एस. विभागप्रमुख) प्रा. सौ. जोे, प्रा. सौ. इंगवले

या प्रकारच्या निकषांवर विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनाचे सूक्ष्म पद्धतीने अवलोकन करण्यासाठी ही समिती ३०, ३१ जानेवारी व १ फेब्रुवारी या तीन दिवसांकरिता ठाण्यात आली होती. या समितीने विद्याप्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनात चालविण्यात येणाऱ्या चार पदविका अभ्यासक्रमांना १९ मार्च, २००४ पासून ३ वर्षांकरिता ॲक्रिडिटेशन बहाल केले आहे. ज्या चार पदविका अभ्यासक्रमांना हा बहुमान मिळाला ते अभ्यासक्रम खालीलप्रमाणे आहेत

१. केमिकल इंजिनिअरिंग
२. इलेक्ट्रिकल पॉवर सिस्टीम
३. इंडस्ट्रियल इलेक्ट्रॉनिक्स
४. इन्स्ट्रूमेंटेशन

नऊ सदस्य असलेल्या या समितीने मंडळाने ठरविलेल्या १००० पॉइंटसवर आधारित मूल्यांकन पद्धतीचा अवलंब करून खालील निकषांवर हे ॲक्रिडिटेशन दिलेले आहे.

| | निकष | पाइंटस् |
|---|---|---|
| १. | संस्थेचे नियंत्रण व कार्यपद्धती | ३० |
| २. | अर्थार्जन, त्याचे विभाजन व वापर | ७० |
| ३. | मूलभूत सुविधा (फिजिकल रिसोर्सेस) | ५० |
| ४. | शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालक यांचा संस्थेशी असलेला परस्पर संबंध | ३०० |
| ५. | अध्यापक व अध्यापन यांची प्रक्रिया | ४५० |
| ६. | संशोधन व सुधारीकरण | ५० |
| ७. | स्टेक होल्डर्स (संस्थेशी संबंधित प्रतिनिधी) | ५० |

ॲक्रिडिटेशन मिळण्याकरिता साडेसहाशेच्या वर पॉइंटस् मिळणे अत्यावश्यक असते. या सर्व गोष्टींचा सखोल आढावा घेण्यासाठी तीन दिवसाचा अवधी लागला.

३० जानेवारी, २००४ ला या समितीने सकाळी विद्याप्रसारक मंडळाचे पदाधिकारी, प्राचार्य व विभागप्रमुखांशी चर्चा केली. त्यानंतर कमिटीच्या सर्व सदस्यांनी वेगवेगळ्या विभागांना भेट दिली. मुख्यत्वे करून सर्वच विद्यार्थ्यांचा संबंध येणाऱ्या ग्रंथालय, वर्कशॉप, संगणक विभाग, प्राथमिक उपचार केंद्र, कॅन्टीन इत्यादी भागांना भेट दिली. दुपारच्या सत्रात तंत्रनिकेतनातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व तंत्रनिकेतनातील विद्यार्थी यांच्याशी चर्चा केली.

दुसरा दिवस ३१ जानेवारी, २००४ ला कमिटीतील दोन -दोन तज्ज्ञांनी स्वत: पारंगत असलेल्या विभागांना भेट दिली. या भेटीत त्यांनी प्रत्येक विभागात शैक्षणिक विषयांच्या संबंधित कागदपत्रे, प्राध्यापकांची शिक्षणदान पद्धत, विभागीय अर्थनियोजनाची आकडेवारी व त्याचे वितरण, प्रयोगशाळेतील उपकरणे व त्यांची देखभाल पद्धत, शैक्षणिक नवीन उपकरणे व त्यांचा वापर (उदा. CD, Internet इत्यादी.) विभागातील विद्यार्थ्यांचे निकाल, जर्नल्स, विभागीय वाचनालय व इतर बाबींचे सखोल निरीक्षण केले. त्या विभागातील प्राध्यापकांशी तसेच शिक्षकेतर कर्मचारी यांच्याशी चर्चा करून त्यांची शिकविण्याची पद्धत तसेच प्रयोग करून दाखविण्याची क्षमता याबाबत निरीक्षण केले.

समितीचे चेअरमन यांनी तंत्रनिकेतनाच्या कार्यालयीन पद्धतीचा आढावा घेतला. यात संस्थेचे उत्पन्न, संस्थेतील प्रवेशाची पद्धत, उपकरणे विकत घेण्याची पद्धत, संस्थेच्या बॅलन्स शीटस् व इतर बाबींवर प्राचार्यांशी सविस्तर चर्चा केली व प्रत्येक गोष्टीचे बारकाईने निरीक्षण केले.

दुपारच्या सत्रात 'स्टेक होल्डर्सशी' संवाद साधला. त्यात माजी विद्यार्थी, त्यांचे पालक, महाराष्ट्र राज्य परीक्षा मंडळ, तंत्रशिक्षण संचलनालय, उद्योजक इत्यादी मंडळी होती. या सर्वांचे संस्थेबद्दलचे मत, संस्थेपासून त्यांना

झालेला फायदा व संस्थेबाबतचा अनुभव यांचा आढावा घेतला गेला. या सर्वच मुलाखत कार्यक्रमाला संस्थेचा एकही प्रतिनिधी हजर नव्हता, ही महत्त्वाची बाब नोंद करावीशी वाटते.

शेवटचा तिसरा, पण महत्त्वाचा दिवस १ फेब्रुवारी, २००४ या दिवशी या समितीने मंडळाचे पदाधिकारी, प्राचार्य व विभागप्रमुखांशी चर्चा केली. त्यात त्यांनी संस्थेच्या तीन दिवसांतील मूल्यमापनाबद्दल त्यांचे मत सांगितले. यात संस्थेच्या चांगल्या गोष्टींची तारीफ केली व त्याचबरोबर ज्या बाबतीत संस्थेला प्रगती करता येणे शक्य आहे, त्याचाही आढावा घेतला. संस्थेच्या जमेच्या बाजूबद्दल बोलताना खालील गोष्टींचा उल्लेख करण्यात आला.

- मोक्याच्या जागेवरील संस्थेचे विस्थापन नीटनेटके, स्वच्छ आणि तांत्रिक शिक्षणाला पूरक वातावरण, विपुल साधनसामुग्री, उपयुक्त स्थितीत असलेल्या उपकरणांनी सुसज्ज प्रयोगशाळा, सर्वांना उपयोगी असलेल्या सोयी, ऑप्टिकल फायबरने जोडलेल्या नेटवरची उत्तम सोय, विद्यार्थ्यांना व प्राध्यापकांना इंटरनेटच्या दिल्या गेलेल्या सुविधा, उत्तम प्रकारचे वाचनालय व वैद्यकीय सोय.
- व्यवस्थापनाची दूरदृष्टी व शैक्षणिक सुविधा पुरविण्याची मानसिक तळमळ व कृती, संस्थेची ध्येये व उद्देश याबद्दलचे स्पष्ट विचार व त्या बाबतचे योग्य प्रदर्शन आणि अत्यंत सहकारी स्वभावाचा शिक्षकवर्ग, महाराष्ट्र तंत्रशिक्षण मंडळाच्या नियमांचे काटेकोरपणे पालन, अभ्यासक्रमाची समाधानकारक पूर्तता, प्राध्यापकांना स्वत:ची शैक्षणिक पातळी उंचावण्याची संधी.
- अध्ययन व अध्यापनाला दिलेले प्राधान्य, वेगवेगळ्या परिसंवादांचे आयोजन, औद्योगिक आस्थापनांना भेटी, औद्योगिक संस्था व तंत्रनिकेतन यांचा एकमेकांतील सहभाग, नवनवीन शैक्षणिक साधनांचा विपुल उपयोग, उत्तम निकाल इत्यादी.
- महाराष्ट्र तंत्रशिक्षण मंडळ - तंत्रनिकेतन समन्वय या संकल्पनेतून चालणारे लॅब मॅन्युअल्स, QUESTION बँकेची उत्पत्ती
- इत्यादी महत्त्वाची कामे करून उच्चत्वाकडे पोहोचण्याची आस्था असलेली संस्था

याचबरोबर समितीने काही उणिवांचीही कल्पना दिली. जगाच्या कोणत्याही कोपऱ्यातून येऊन या संस्थेत शिक्षण घेण्याची इच्छा असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी हॉस्टेलची सोय संस्थेत नाही. समितीने संस्थेने स्वत:च्या उणिवा स्वत:च शोधून त्यावर उपाययोजना करून ही संस्था अधिक उत्तम करण्याचा प्रयत्न करावा. कारण तसे करण्याची शक्ती आणि तळमळ व्यवस्थापन व संस्था या दोहोंमधेही असल्याचे निदर्शनास आणून दिले.

समितीने डॉ. वा. ना. बेडेकरांसारख्या शिक्षण महर्षींच्या आशीर्वादानेच व त्यांच्या प्रेरणेने सुरू झालेल्या व त्यांचे सदैव मार्गदर्शन असणाऱ्या तंत्रनिकेतनाला उच्च पातळी गाठण्यास कोणताच अडसर येऊ नये, असे जाणीवपूर्वक सांगितले.

श्री. सी. श्री. मुजुमदार
प्राचार्य
विद्याप्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन, ठाणे